

कथासंग्रह

# लास्या

संजीवनी देशपांडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

दिर्घकथासंग्रह

# लास्या

## लेखिका : संजीवनी देशपांडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# लास्या

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लास्या

## लेखिका : संजीवनी देशपांडे

फोन नंबर : 9860787611

ईमेल : chaafa9@gmail.com

ब्लॉग/वेबसाइट: www.chaafa.com

पत्ता: 'गोकुळ', , विवेकानंदपुरम, लातूर-४१३५१२

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १ जून २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**संजीवनी देशपांडे**. मराठी ब्लॉगर असून त्यांचा 'चाफा' हा ब्लॉग मराठी वाचकांच्या मनात स्थान राखून आहे. चतुरंग, लोकसत्ताच्या कथादालन या सदरात लेखिकेची 'बकुलावली' ही कथा एप्रिल २०२० मध्ये छापून आली होती. लघुकथा, दीर्घकथा, कविता, ललित इ. विविधांगी लेखन लेखिकेने आजवर केलेले आहे.


बहुतांश लेखन त्यांच्या वेबसाइटवर वाचकांसाठी खुलं आहे.

संपर्क : **संजीवनी देशपांडे**

फोन नंबर : 9860787611

ईमेल : chaafa9@gmail.com

ब्लॉग/वेबसाइट: www.chaafa.com



**‘माझे आजोबा,**

**कै. डॉ. मनोहरराव पाटील**

**यांना अर्पण’**

# लास्या

## स्त्री मनातील तरल संवेदनांचा शब्दानुभव

‘लास्या’ हा ‘विजिगीषा’ आणि ‘सावली’ या दोन दीर्घकथांचा संग्रह आहे.

विजिगीषा ही प्राचीन आणि आधुनिक दोन काळात घडणारी कथा आहे. काळ बदलला तरी स्त्रीच्या आयुष्यातील काही मूलभूत गोष्टी फारशा बदलत नाहीत. स्वत:चं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी झगडणाऱ्या दोन भिन्न कालखंडातील नायिकांचा हा प्रवास आहे. कोणत्या समान गोष्टी त्यांना एकमेकींशी बांधून ठेवतात आणि त्या त्यांच्या अपेक्षित ध्येयापर्यंत पोचतात की नाही हे कथेत उलगडून दाखविले आहे.

सावली ही एका कथ्थकचं प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीची गोष्ट आहे. कथा नायिकेचा आत्म-शोधाचा प्रवास त्यातून उलगडत जातो.

# लास्या

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| विजिगीषा | 10 |
| सावली | 62 |


**सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

# विजिगीषा

मुख्य रस्ता सोडून रिक्शा आत वळली आणि साधारण १-२ किमी आत गेल्यावर मंदिराची भग्नावस्थेतील तटबंदी दिसू लागली.. थोडं पुढे आल्यावर रिक्षा थांबवून रिक्षावाला म्हणाला, ‘मॅडम, आलं बगा तुमचं मंदिर.. जाऊन या तुमी निवांत, मी थांबतोय मनलं इतच!’

मनवा रिक्षामधून उतरली आणि त्या अर्धवट पडलेल्या अवस्थेत असलेल्या मोठ्या दगडी कमानीकडे तिने पाहिलं.

ती इथे पहिल्यांदा आली होती तेंव्हाही अशीच पहात राहिली होती त्या कमानीकडे.. काहीतरी तिला तेव्हाही आकर्षून घेत होतं.

त्यावेळी तिला कुठे माहीत होतं की ती एवढी प्रेमात पडेल या मंदिराच्या! ती कमानीतुन आत आली.. तो आतला प्रशस्त परिसर तिला सुखाऊन गेला. चहुबाजूच्या छिन्न-विच्छिन्न तटबंदीच्या आत अगदी मधोमध दगडी चबुतऱ्यावर ऊभं असलेलं ते अगदी प्राचीन असं शैव पंचायतन प्रकारातलं मंदिर देखणं दिसत होतं. त्यात तटबंदीच्या आत चहुबाजूंनी असलेला पळस लालसर केशरी रंगामध्ये न्हाऊन निघत होता.. वसंत ऋतू हा त्याच्या बहराचा ऋतू! लाल फुलांच्या दाट सड्यामध्ये मधोमध ऊभं असलेलं ते काळ्या पाषाणातलं मंदिर डोळ्यांचं पारणं फेडत होतं.

एखादी जागा आपल्याला का कोणास ठाऊक अगदी जवळची वाटू लागते. आपलं तिच्याशी काहीतरी नातं आहे असं वाटू लागतं. अगदी असंच वाटलं होतं मनवाला ती वर्षभरापूर्वी इथे आली होती तेव्हा. तिच्या बॅचने मोजक्या प्राचीन मंदिरांच्या स्थापत्याचा प्रत्यक्ष तिथे जाऊन अभ्यास करावा या हेतूने एक ट्रीप आयोजली होती. त्यावेळी या मंदिराचीही धावती भेट त्यांनी घेतली होती. तेव्हापासून हे मंदिर तिच्या मनात घर करुन होतं. ट्रीपहुन परतल्यावर तिने ध्यास घेतला त्याचा आणि दिवस दिवस लायब्ररीमध्ये बसून अभ्यास केला, माहिती गोळा केली. अजून अजून त्याच्या प्रेमात पडत गेली. तिने ठरवलं, शेवटच्या सत्रातल्या प्रोजेक्टसाठी हेचं मंदिर निवडायचं. आणि आता ते प्रोजेक्ट

असाइनमेन्ट तिच्या विभाग प्रमुखांकडून शिक्कामोर्तब झाल्यावर मंदिराचा विस्तृत अभ्यास करण्यासाठी ती पुन्हा इथे आली होती.

पुरातत्व खात्याच्या अखत्यारीत असल्यामुळे मंदिराचं व्यावसायीकरण झालेलं नव्हतं. त्यामुळे इतर मंदिरात दिसणारी दुकानांची, पुजाऱ्यांची, भाविकांची गर्दी इथे अज्जिबात नव्हती. अतिशय शांत आणि रम्य वातावरणात तटस्थपणे शतकांपासून उभ्या असलेल्या भूमिज शैलीमधल्या त्या मंदिरात केवळ काही मोजक्या पर्यटकांची किंवा मग चार-दोन हौशी छायाचित्रकारांचीच वर्दळ असायची. आजचंही चित्र काही वेगळं नव्हतं.

इतकावेळ मनावर साठलेले सारे मळभ त्या तिथल्या वातावरणात तिला दूर होत असल्यासारखे वाटायला लागले. ती चबुतऱ्यावर चढली, आणि मंदिराच्या पायऱ्या चढून आत गेली. रेखीव सभामंडप आणि आत गर्भगृह अशी ती रचना होती. आणि या मुख्य मंदिराच्या भोवती चारी बाजूंना एक एक अशी, श्री पार्वती, श्री गणेश, सूर्यदेव आणि श्री विष्णू यांची छोटी छोटी मंदिरं होती.. एका अखंड चबुतऱ्यावरचा हा पाच मंदिरांचा समूह म्हणून ते शैव पंचायतन! आतल्या शिवलिंगाला नमस्कार करुन ती बाहेर आली आणि आता अभ्यासासाठी मंदिराच्या बाहेरच्या बाजूने कोरलेल्या शिल्पांची स्केचेस काढून घ्यावी म्हणून सॅक उघडून

साहित्य बाहेर काढू लागली.. पण इतका वेळ प्रयत्नपूर्वक बाजूला सारत असलेले मनातले विचार पुन्हा पुन्हा मान वर काढत होते आणि तिला अस्वस्थ करत होते!

काल संध्याकाळचं रोहनचं बोलणं तिला परत आठवू लागलं आणि त्याच्या वागण्याचे अर्थ लावण्यात तिचं मन गढून गेलं..

नाशिकला जाण्याआधी रोहनला एकदा भेटून घ्यावं म्हणून मनवा त्याला भेटायला आली होती.. त्याच्याशी बोलताना ती उत्साहाने भरुन गेली होती,

'रोहन, रोहन, रोहन.. फायनली माझ्या प्रोजेक्टचा विषय अप्रुव्ह झाला.. सरांनी परवानगी दिली!! आता मी उद्याच नाशिकला जाऊन मंदिराच्या फिल्ड स्टडीला सुरुवात करायचं ठरवलंय.. सिन्नरला एक मैत्रीण आहे माझी तिच्याकडे रहायची सोयही झालीये.. आणि ती मला हवी ती सगळी मदत पण करणार आहे! सो आईचंही समाधान झालंय.'

मनवाला काय सांगू आणि काय नको असं झालं होतं पण मग रोहनची प्रतिक्रिया ऐकून ती थोडीशी ओशाळली..

‘काय यार मनु! हे काय काढलंयस तू मध्येचं? या वीकेन्डला आई-पपा युएसला जातायत, त्याआधी एक छोटं गेट टूगेदर अरेंज केलं होतं मी!’

‘अरेंज केलं होतं म्हणजे? अरे मला काहीच म्हणाला नाहीस तू! असं कसं ठरवून टाकलंस?’

‘तुला काय सांगायचंय त्यात.. तू कुठे जाणारेस असं वाटलं मला!’

‘रोहन! मलाही कामं असतात!’

‘हो माहितीय.. जुने पुराणे ग्रंथ वाचत बसायचं काम!’

‘गप हं आता.. मी तुझ्या त्या बोरींग मल्टीनॅशनल बॅंकेतल्या त्याहून बोरींग जॉबवरुन काही बोलते का तुला!’

‘काय बोलणार आहेस तू? त्या जॉबला एक स्टेटस आहे. एलिट क्लासमध्ये ऊठ-बस असते माझी.. आणि वर घसघशीत पॅकेज! करिअर असावं तर असं! नाहीतर तू.. चांगलं ब्राईट फ्युचर सोडून पडक्या मंदिरांमधून फिरत असतेस.’

‘रोहन! आर यु सिरिअस? माझं आर्ट्सला जाणं.. इतिहासाची पदवी घेणं आणि आता इंडोलॉजीमध्ये मास्टर्स करणं.. या साऱ्याचं कौतुक करायचास नं तू?? आणि आता हा असा विचार करतोयस?’

‘अर्थात! भीकेचे डोहाळे आहेत हे सारे.. याने ना मान मिळतो ना पैसा! तूझी आवड म्हणून मी जाऊदे म्हणत आलो. पण आता ती मला डोईजड वाटू लागलीये. यू आर बिकमींग ओव्हर कम्पॅशनेट अबाऊट इट!’

‘ओह खरचं का? आणि तू रे? तू नाहीयेस ओव्हर कम्पॅशनेट तुझ्या जॉब विषयी? डेडलाइन्स असल्या की आठवडा आठवडा भेटत नाहीस मला.. मी अशीचं रिॲक्ट होते तेंव्हा?’

‘कम ऑन मनवा.. माझं काम इम्पॉर्टन्ट आहे! जुने दस्तऐवज आणि मंदिरं उकरत बसून कोणाचं पोट भरणार नाहीये.’

‘पुरे रोहन! आज तू काहीही बोलतोयस. मी उद्या नाशिकला जातेय.. परत आले की बोलू आपण!’

आणि मनवा जायला निघाली.

‘हो, नक्की बोलू! पण त्यावेळी येताना तुला नक्की काय हवंय ते मनात पक्कं करुन ये! बाय!’

त्याच्या या वाक्याने ती स्तिमीत झाली. हा असं कसं म्हणू शकतो? आपण निवडलेला मार्ग इतका क्षुल्लक वाटतो याला? एक ना अनेक प्रश्न तिच्या मनात पिंगा घालू लागले.

.....

‘राजकुमारीजी..’

‘कोण?’

‘मी.. नवलेखा.. तुमची दासी.’

‘हम्म.. बोल!’

‘महालातून निरोप आहे.. तुम्हाला त्वरित राजमहालात येण्यास सांगितले आहे. दक्षिणेतून स्वार आला आहे, काहीतरी महत्वाचं असावं! आणि...’

‘आणि काय?’

‘आणि महामात्यांचं म्हणणं आहे की राजकुमारींचं असं या वनातल्या मंदिरात, पाषाणावर विश्रांती घेणं योग्य दिसत नाही.. तुम्हाला हवं असल्यास इथे एखाद्या कक्षाची व्यवस्था करुन दिली जाऊ शकते!’

‘पुरे!! आम्ही कुठे विश्रांती घ्यायची ते आम्ही ठरवणार! यानंतर आम्हाला योग्य-अयोग्य शिकवायला येणं त्यांच्यासाठी ‘योग्य’ ठरणार नाही असं कळवा महामात्याना!!’

थोड्याशा आवेगातच राजकुमारी वरदायिनी तिच्या प्रिय अश्वावर स्वार होऊन राजमहालाच्या दिशेने निघाली.

महालात प्रवेश केल्यावर महाराज, महाराणी, महामात्य आणि राजमाता सगळयांना या वेळी महालात एकत्र पाहून वरदायिनीला आश्चर्य वाटलं..

तिचं स्वागत करत महामात्य म्हणाले,

'या राजकुमारी जी, आम्ही आपलीच प्रतिक्षा करत होतो'

त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करत वरदायिनीने महाराजांना अभिवादन केलंआणि ती महाराणींच्या बाजूच्या आसनावर जाऊन स्थानापन्न झाली.

तिला उद्देशून महाराज म्हणाले,

'वरदायिनी, एक अतिशय बुद्धिमान आणि हरहुन्नरी पुत्री म्हणून तुझा आम्हाला अभिमान आहे! परंतू तुझे हेच गुण तुझ्या विवाहाच्या आड येत होते.. तुला साजेसा वर शोधणं कठीण काम झालं होतं. पण आता आमची चिंता मिटली आहे.. चालुक्य कुलोत्पन्न महाराज श्री आदित्येय यांनी आपणहून तुला मागणी घातली आहे! तुझ्या निमित्ताने एका मोठ्या साम्राज्याशी आपलं राज्य जोडलं जाणार आहे.'

‘आणि माझा या विवाहास विरोध असेल तर?’ वरदायिनीने ठाम स्वरात महाराजांना प्रश्न केला.

त्यावर महामात्य म्हणाले,

‘विरोध असण्याचं तसं काही कारण आमच्या दृष्टिस येत नाही राजकुमारीजी!’

‘अर्थात! ते ‘तुमच्या’ दृष्टिस येण्याचे काही कारणच नाही महामात्य.. विवाह ‘आमचा’ निश्चित होतो आहे!’

राजकुमारीच्या तीक्ष्ण उत्तराने महामात्यानी नजर जमिनीकडे वळवली.

‘महाराज, तुम्हाला काय वाटते, चालुक्य सम्राटाची उत्तरेकडे कूच करण्याची तयारी पाहून आपण आपल्या या विद्वान मंत्रीगणांच्या सल्ल्याने, या सेवण राज्याच्या युद्धविद्यापारंगत, बहुविधशास्त्रनिपूण राजकुमारीस, एखादे वस्त्र भेट द्यावे त्या आविर्भावात, तहाचे साधन करु पहात आहात हे आम्हास समजत नाही??’ उद्विग्न होऊन वरदायिनी महाराजांना संबोधत होती,

‘महाराज क्षत्रिय आहात आपण! क्षत्रियांसम समरांगणाची भाषा करा तेच तुम्हास शोभून दिसेल! द्या

आज्ञा.. ही वरदायिनी त्या चालुक्यांशी लढून विजयश्री घेऊनच परत येईल!'

'पुत्री, आपल्या राजकुमारीस लढायास पाठविले म्हणून हसेल हा भारतवर्ष आमच्यावर!' महाराज हताश होऊन उद्गारले!

'आणि राजकुमारीचा व्यवहार केला हे कळल्यावर आपला गौरव होणार आहे महाराज?'

क्रोधित आणि व्यथित होऊन वरदायिनी महालातून बाहेर पडली आणि अश्वारूढ होऊन वनात निघून गेली!

राजकुमारी वरदायिनी धाडसी होती आणि बुद्धिमानही! राज्य चालवण्याची, राज्याची राणी होण्याची तिची महत्वाकांक्षा होती.. महाराज मणिचंद्रांना पुत्र नव्हता आणि ज्येष्ठ कन्या असल्या कारणाने आपणच या राज्याच्या उत्तराधिकारी आहोत हे तिने तिच्या मनावर बिंबवलं होतं..

तिला नेहमी वाटायचं, भारतवर्षाला इतक्या दिग्गज राजा-महाराजांचा इतिहास आहे पण त्यात एकही स्वयंभू राणी नाही.. ज्या होऊन गेल्या त्या साऱ्या महाराण्या नाहीतर

पट्टराण्या, सवतींशी ईर्ष्या करण्यात धन्यता मानणाऱ्या.. केवढा हा दैवदुर्वीलास! अन्याय सहन करत जगणाऱ्या स्त्रिया तिला भावायच्या नाहीत.. सीतेला वनवासास पाठवणाऱ्या श्रीरामांचा आणि द्रौपदीला द्यूतक्रिडेत वस्तूसमान पणाला लावणाऱ्या युधिष्ठीराचा तिला मनोमन राग यायचा!

पण एक दिवस तिच्या कानांवर बातमी आली की महाराज मणिचंद्र दत्तक पुत्राच्या शोधात आहेत. ते ऐकुन ती क्रोधाग्नीत तळपू लागली.. क्षणात तिच्या लक्षात आले की आपल्याला डावलले जातेय.. तिच्या मनात प्रश्नाचं काहूर उठलं.. आपण केवळ एक स्त्री आहोत म्हणून राज्य चालवण्यास असमर्थ समजले जातो?? आपल्यातल्या गुणांचा विचारच केला जाऊ शकत नाही??

तिला वाटायचं महाराजांना एक पुत्री म्हणून आपला अभिमान आहे.. कुठलंही एक क्षेत्र तिने स्वत:ला सिद्ध करायचं ठेवलं नव्हतं.. महाराज उत्तराधिकारी म्हणून आपलाच विचार करणार याची तिला खात्री वाटायची.

पण झालं उलटचं.. तेव्हापासून तिचं मन महालावरुन उठलं.. आणि ती बराचसा वेळ या शिवमंदिरात काढू लागली.

मोकळ्या आकाशाकडे पहात मंदिरात दिवस दिवस ती घालवू लागली.. कधी ती ग्रंथ वाचायची.. कधी गायन करायची तर कधी चक्क तलवारबाजी! इथे तिला मोकळं वाटायचं.. सेवण राज्याचे मूळपुरुष राजा रविचंद्रांनी ते मंदिर तलावाच्या खोदकामा दरम्यान सापडलेल्या पाषाणाचा वापर करुन बांधून घेतलं होतं.. त्याची रचना, बांधणी, पंचायतन सारं काही विलोभनीय होतं.. त्यातल्या सूर्य मंदिराविषयी तर राजकुमारी वरदायिनीला खूप ओढ वाटायची..

.......

'काय मॅडम, अख्ख्या जगात विचार करत बसण्यासाठी हीचं जागा मिळाली काय तुम्हाला?'

मनवाने दचकून वर पाहिलं तर गळ्यात कॅमेरा अडकवलेला कुणीतरी तरुण तिच्याकडे रोखून पहात होता. त्याच्या तिरकस प्रश्नाला तितकंच तिरकस उत्तर देत ती म्हणाली,

'हो! तुम्हाला काही अडचण आहे?'

‘नाही.. तुम्ही काही का करेनात मला काय करायचंय त्याच्याशी! पण तुम्ही आत्ता जिथे बसून गहन विचार करताय नं तिथे एक शॉट घ्यायचाय मला.. ते कपल खोळंबलंय तिकडं!’

‘काय हे टूकार फोटोग्राफर!’ असं म्हणत मनवा तिथून उठली. ‘प्री-वेडींग नावाचं खूळ निघालंय आजकाल’ असंही काहीसं ती पुटपुटली.

मनातल्या विचारांना थोडं बाजूला सारत तिने मग तिचं लक्ष मंदिरावर केंद्रित केलं. भिंतींवरची शिल्पं जवळुन पाहत ती तिची निरीक्षणं वहीत नोंदवू लागली. ढोबळमानाने ते मंदिर हेमाडपंती समजलं जात होतं. त्याची बांधकामाची पद्धत हेमाडपंती शैलीशी मिळतीजुळती होती. त्या प्रदेशात आढळणारा काळा पाषाण इंटरलॉकिंग पद्धतीने एकमेकात गुंफून केलेलं चुनाविरहित बांधकाम! पण मंदिराचा कालावधी काही कोणाला निश्चित करता आला नव्हता. अकराव्या-बाराव्या शतकातलं ते बांधकाम असावं असा अंदाज होता. पण खात्रीशीररित्या काही सांगावं असे पुरावे मिळाले नव्हते. काही तज्ञांनी ते तीन हजार वर्षांहूनही जूनं असु शकतं असेही दावे केले होते. तिथल्या भिंतींवर कोरलेल्या अप्सरा, रामायणातील प्रसंग, हत्ती, त्यांची ती शिल्पशैली ११-१२ व्या

शतकातील किंवा हेमाडपंती मंदिरांसारखी तिला वाटली नाही. नक्कीच वेगळी वाटली.. पण ते वेगळेपण तिला पॉइंट आऊट करता येत नव्हतं!

त्या शिल्पांवरुन हात फिरवता फिरवता तिला वाटून गेलं, पाषाणांतून हे असं देखणं मंदिर कोरणारी ती देखणी बोटं कोणाची असतील.. कोणत्या काळातली असतील.. ते जरी आता कालातीत झाले असले तरी त्यांनी निर्मिलेलं हे पाषाणातलं काव्य आजही माझ्यासारख्या हजारोंना वेड लावतंय.. ओढून घेतंय! किती अनभिज्ञ असतो आपण आपल्या भूतकाळाविषयी! आपण कुठून आलो, कसे आलो याबद्दल किती संदिग्धता असते..

ती पूर्वी होऊन गेलेली माणसं कशी असतील, कसा विचार करत असतील.. त्यांचे प्रश्न काय असतील.. कधीकाळी जे सत्य होतं ते आता केवळ पुराव्यांअभावी अस्तित्वहीन कसं काय होऊ शकतं?!

आत्ता जे घडतंय तेचं तेवढं खरं असं समजून जगणारे लोकही आहेतच की.. रोहन सारखे! त्याचा विचार मनात आल्यावर तिला वाटलं, आपण वर्तमानाबद्दलही अनभिज्ञच असतो की. आपल्याला वाटायचं रोहनला आपली स्वप्नं कळतात, 'आपण' कळतो.. पण तसं नाहीच मुळात!

मंदिराच्या त्या पुरातन शिखराकडे पहात ती मनात म्हणाली, ही अशी मंदिरं, प्राचीन अढळ स्थापत्यच खरे साक्षीदार असतात, भूत आणि वर्तमानाचे.. उद्या भविष्याचेही असतील! मीही एक दिवस मातीत मिसळून जाईन पण हे मंदिर इथेच असेल, सारंकाही तटस्थपणे पाहत! माझ्यासारख्या किती जणी याने पाहिल्या असतील, किती जणींची सुख-दु:खं अनुभवली, ऐकली असतील, किती जणींच्या आयुष्याचा साक्षी ठरला असेल..

....

व्यथितावस्थेत राजकुमारी मंदिरात आली. वरवर क्रोधाने तळपत असली तरी आत कुठेतरी ती मनोमन अश्रू ढाळत होती. वरदायिनी थेट गर्भगृहात गेली आणि कितीतरी वेळ शिवलिंगासमोर नुसती बसून राहिली. रोज ज्या कविराजांचं काव्य ऐकण्यासाठी तिचे कान आतुर असायचे त्या कविराज नीलवदनकडे आज तिने वळुनही पाहिलं नाही. कविराजांना अर्थात साऱ्या वृत्तांताची कल्पना आली होती त्यामुळे ते तिला भेटायला आज स्वत:हून मंदिरात येऊन पोहोचले होते.

वरदायिनीची स्वप्नं चार-चौघींसारखी नव्हती. इतर राजकुमाऱ्यांसारखी ती दर्पण आणि आभूषणांमध्ये रमायची नाही. लहानपणापासूनच तिला ग्रंथालयाची आणि युद्धशाळेची ओढ होती. तिचा हट्ट पाहून महाराजांनी तिला तिच्या आवडीचं शिक्षणही दिलं.. जसजशी वरदायिनी मोठी होत गेली तसतशी अधिकाधिक तेजाने उजळू लागली.. ती रणांगणात जायला लागली.. मोठमोठ्या योद्ध्यांना तिच्या अंगभूत चपळाईने आणि पराक्रमाने धूळ चारू लागली. तिची ही प्रगती मात्र राजमहालाच्या चिंतेचा विषय ठरत होती. एव्हाना तिची महत्वाकांक्षा काही कोणापासून लपून राहिलेली नव्हती. महाराजांना भिती वाटायची एका स्त्रीच्या हाती राज्यकारभार सोपवण्याने आपला सेवणवंश लयाला जाईल.. मंत्रीगणांनी तशा वदंताच उठवल्या होत्या.. त्यांना एका स्त्रिच्या अधिपत्याखाली राहणं कमीपणाचं वाटत होतं! आणि मग त्या गलिच्छ राजकारणाला महाराज मणिचंद्र बळी पडले आणि त्यानी राजकुमारी वरदायिनीचं स्वप्न तिच्यापासून हिरावून घेतलं. ती तेव्हाही व्यथित झाली होती पण महाराजांची इच्छा असं म्हणत मनाची समजूत घालायला लागली होती.. त्यामागचं राजकारण तिला कळत नव्हतं असं नाही पण

पित्याचा मान राखायचा म्हणून उघड-उघड ती काही बोलली नाही.

तो घाव भरतोय न भरतोय, तिच्यावर हा दुसरा आघात झाला होता. विवाह करुन आजन्म शोभेची वस्तू बनुन राहणं तिला नकोसं वाटायचं आणि त्यामुळेच स्वत:वर कसलीही बंघनं कधी लादून घ्यायची नाहीत हे तिनं ठरवलं होतं. तशी बंधनं न लादता जर कोणी राजपुत्र तिच्याशी विवाहास तयार असेल तरच ती विवाहाचा विचार करणार होती. पण आज विवाहाच्या नावाखाली आपला चक्क व्यवहार होतोय हे कळल्यावर तिच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तिचा स्वाभिमान दुखावला गेला होता. आता ती शांत राहणं शक्यच नव्हतं..

....

आपली निरीक्षणं आणि काढलेले फोटोग्राफ्स घेऊन मनवा निघाली.. याचं विषयाचा अभ्यास करणाऱ्या एका संशोधकाशी दुसऱ्या दिवशी इथेच तिची भेट ठरली होती! मावळतीची किरणं

अंगावर घेऊन अजून लोभस दिसणारं मंदिर डोळ्यांत साठवत ती जायला निघाली. इतक्यात,

‘रोज संध्याकाळी हे असंच सुंदर दिसतं पाय निघत नाही मग इथुन’

मंदिराकडे पाहात असलेल्या मनवाकडे पहात तो मगाचचा फोटोग्राफर तरुण बोलत होता,

‘हाय.. मी अनिकेत!’

त्याच्या हायकडे पूर्ण दुर्लक्ष करत, तिचं सामान सॅकमध्ये भरता भरता मनवा म्हणाली,

‘झालं नाही का अजुन तुमचं शुटींग!’

‘आजच्या पुरतं झालं!’ अनिकेत उत्तरला

‘आजच्यापुरतं म्हणजे?’ सॅक पाठीला अडकवत मनवा विचारत होती

‘म्हणजे या कपलचं शुटींग संपलंय. आता पुढचं असाईनमेन्ट मिळेपर्यंत मी इथे येऊन मनसोक्त फोटोग्राफ्स काढायला मोकळा! आपली आवड जपायची असेल तर ही प्री-वेडिंग सारखी ‘खुळं’ सहन करावी लागतात आमच्या सारख्या ‘टूकार’ फोटोग्राफर्सना.. पैसे त्यातुनच मिळतात नं!’

आपलं मगाशीचं बोलणं याने ऐकलंय तर असं म्हणून मनवा त्याला म्हणाली,

‘डोन्ट टेक इट पर्सनली.. मी ते तुमच्या तिरकस बोलण्याला उत्तर म्हणून बोलले होते.’

‘हाहा! नाही हो, एवढ्या छोट्या गोष्टी मी मनावर घेत नाही! बाय द वे, तुम्ही हे दिवसभर, या मुर्तीला हात लाव, त्या मूर्तीला भिंग लावून बघ हे काय करत काय होतात नक्की? म्हणजे मला जरावेळ वाटलं मंदिर नक्की दगडाचंच आहे की सोन्याचं.. ही बाई इतकं निरखून काय बघून राह्यली याला!’ असं म्हणून तो स्वत:च्याच विनोदावर हसला.

‘तुम्ही नेहमीच असं टुकार बोलता की आज काही विशेष आहे’ मनवा निर्विकारपणे म्हणाली

त्यावर ‘टुकार हा तुमचा आवडता शब्द आहे का’ असं म्हणून तो पुन्हा हसला.

‘मी इंडोलॉजीची विद्यार्थिनी आहे आणि इथे या मंदिराचा अभ्यास करण्यासाठी आलेय’ असं म्हणून ती जायला निघाली.

‘अच्छा म्हणजे मढी उकरायचं काम करता तर तुम्ही!’

यावर मनवा भलतीचं चिडली.. आधीच रोहनच्या बोलण्यामुळे ती खंतावली होती,

‘लिसन मिस्टर तूम्ही जे कोणी आहात.. डोन्ट यू डेअर इन्सल्ट माय प्रोफेशन.. इट इज ॲज इम्पॉर्टन्ट ॲज युअर्स.. गॉट इट?’

‘हो अर्थात! पण मग दुसऱ्यांची टर उडवताना तुम्हीही ह्याचा विचार नक्की करत जा!’ अनिकेत शांतपणे म्हणाला

आपलं आधीचं बोलणं आठवून मनवा थोडीशी नरमली आणि तिच्या लक्षात आलं, आपण वड्याचं तेल वांग्यावर काढलंय!

मग ती त्याला सॉरी म्हणाली,

त्यावर तो तिला म्हणाला,

‘तुम्ही नेहमीच अशा चिडलेल्या असता की आज काही विशेष आहे?!’

आणि मग यावर ते दोघेही हसले..

त्याला बाय करुन निघाल्यावर नाही म्हटलं तरी मनवाच्या मनात विचार आलाचं, हे असं हलकं-फुलकं संभाषण रोहन सोबत होऊन किती काळ लोटला असेल..

तिची आणि रोहनची पहिली भेट केव्हा झाली हे आठवणं तिला तसं  कठीण होतं.. कारण कळायला लागल्यापासूनच्या

तिच्या प्रत्येक आठवणीमध्ये तो होताच... कायम.. तो तिचा बालमित्र, वर्गमित्र, सवंगडी, प्रियकर सारं काही होता! शाळा संपल्यावर तिने चांगले मार्क्स असुनही कला शाखा निवडली आणि दोघांच्या करिअरच्या दृष्टिकोनातून वाटा वेगळया झाल्या. रोहनला पहिल्यापासूनच मॅनेजमेन्ट करायचं होतं सो तो कॉमर्स निवडणार हे साऱ्यांना ठावुक होतं. पण मनवा विषयी संदिग्धता होती. तिची हुशारी पाहून सर्वांना वाटायचं ही वडलांसारखी डॉक्टर होणार म्हणून! पण दहावीनंतर कला शाखा निवडून तिने सगळ्यांना धक्का दिला होता. तिला तिची इतिहासाविषयीची ओढ जपायची होती. आणि म्हणून तिने प्रवाहाविरुद्ध जाण्याचं धाडस दाखवलं.

नंतर सारं ठीक होत गेलं. डीग्री मिळाल्यावर सगळ्यांच्या अपेक्षेप्रमाणे रोहनने मनवाला प्रपोज केलं.. सारे आनंदात होते. आता सहा महिन्यानी, मनवाचं मास्टर्स झाल्यावर दोघांचं लग्नही ठरलेलं होतं. पण आधी लाईटली घेतलेलं मनवाचं हे इंडोलॉजीस्ट बनायचं पॅशन रोहनला डोईजड वाटु लागलं, त्याच्या त्या पंचतारांकित आयुष्यात त्याला ते कमीपणाचंही वाटत असावं कदाचित.. पण त्या दोघांमध्ये एक अनामिक तणाव मात्र नक्कीचं निर्माण झाला होता!

रिक्शात बसल्यावर मनवाने डोळे मिटून घेतले, आणि रोहनच्या भाषेत तिला नक्की काय हवंय ते शोधण्याचा प्रयत्न करु लागली..

....

बऱ्याचं वेळाने काहीतरी ठाम निश्चय झाल्यासारखी राजकुमारी वरदायिनी सभामंडपातून बाहेर आली. आणि पंचायतनातल्या पुर्वाभिमुख सूर्य मंदिरासमोर उभी राहिली, त्याच्या बरोबर मागे क्षितिजापाशी मावळतीचा सूर्य तळपत होता. तिने सूर्याला वाकून नमस्कार केला आणि ती त्या लाल-केशरी किरणांमध्ये न्हाऊन निघाली, जणु काही सूर्यदेवाने तिला तथास्तू असा आशिर्वादच दिला. तो हृदयात साठवत तिने डोळे उघडले आणि वळली.. समोर नवलेखा आणि कविराज उभे होतेचं!

कविराजांना उद्देशून वरदायिनी नेहमीपेक्षा ठाम स्वरात उद्गारली,

‘बोला कविराज, काय वार्ता?’

अपेक्षित प्रश्न ऐकून कविराज उत्तरले,

'राजकुमारीजी, संपूर्ण नगरात विवाह वार्ता पसरवली गेली आहे. महालात विवाहाच्या तयारीसही प्रारंभ करण्यात आला आहे! आजच चालुक्याधीश आदित्येयांनी इकडे येण्यासाठी प्रस्थान केलं आहे, येत्या पौर्णिमे पर्यंत केंव्हाही ते नगरात दाखल होतील! त्यांच्या सोबत चतुरस्त्र सेना सुद्धा आहे! राज्याभिषेकानंतरची ही त्यांची पहिलीचं स्वारी असून न लढता विजयश्री मिळाल्याने ते अतिशय प्रसन्न असल्याचंही ऐकिवात आहे!'

राजकवी असल्याने नीलवदन यांना दरबारातल्या इत्तंभूत वार्ता ज्ञात होत्या. आणि त्या येऊन राजकुमारींना सांगणं ते त्यांचं आदि कर्तव्य मानत! वरदायिनीमुळेचं तर त्यांना त्यांचं पद मिळालं होतं! संस्कृतचं प्रभूत्व असलेल्या राजदरबारात राजकुमारीने या प्राकृत भाषेत काव्य करणाऱ्या नवोदित कवीला मानाचं स्थान दिलं होतं. अर्थात त्याचं काव्यही अप्रतिमच होतं पण प्राकृत महरट्ठ भाषेला तोवर तरी जनसामान्यांच्या बोली व्यतिरिक्त कुठेही स्थान नव्हतं पण वरदायिनीने तिला संस्कृत जडत्वाने भारलेल्या राजदरबारात

आणून ते बहाल केलं! तिच्यातल्या या अशा गुणांमुळेचं तर ती सामान्यांच्या ह्रदयावर राज्य करायची!

सारं वृत्त ऐकून वरदायिनी म्हणाली,

‘अरे वा! आनंदाचं वातावरण आहे तर चोहीकडे.. कविराज, ते तसंच राहिल याची काळजी घ्या! आणि तुमचं इथे येणं सध्यातरी गुप्त ठेवा.’

‘नवलेखा.. महालात कळव, राजकुमारी विवाहास तयार आहेत!’

आणि पुन्हा कविराजांकडे वळुन, एक दीर्घ श्वास घेऊन तिने त्यांना विचारलं,

‘आम्ही योग्य तेच करत आहोत ना कविराज?’

तिच्या बोलण्याचा रोख त्यांना लगेच उमगला, जरासं थांबून हातातलं पलाश पुष्प तिला देत ते म्हणाले,

*पलाश रंगी, पाषाण शयनी*
*गर्भनाळेतुनी आवतरली मृगनयनी।*

*रक्ताभिषेक शिवसूर्यचरणीं*
*सुभग शुचित मंगल ही वरदायिनी ।।*

त्यांचं काव्य ऐकून वरदायिनी ओळखीचं हसली. तिने न सांगता तिचा विचार कविराजांनी ओळखला होता.

ती त्यांना म्हणाली,

'चला तर मग, वेळ कमी आहे! गर्भ नाळ त्वरित स्वच्छ करुन घ्या!'

ती आज्ञा उमगुन कविराज लगोलग कामाला लागले. सोबत काही विश्वासाची माणसं घेऊन ते मंदिराच्या 'गर्भ'गृहाकडे निघाले.

नवलेखाकडून मिळालेला निरोप ऐकून महालात आनंदाचं वातावरण पसरलं. महाराज मणिचंद्रांना वाटतच होतं, चालुक्य कुलाची थोरवी ऐकून राजकुमारी विवाहास नक्की तयार होईल. तेही आता निश्चिन्त झाले. पण महामात्यांच्या मनात मात्र अजुनही शंकेची पाल चुकचुकत होती, ऐनवेळी राजकुमारींनी काही दगा फटका करु नये म्हणून त्यांच्या पाळतीवर त्यांनी माणसं ठेवली. आणि विवाहादी

विधींच्या तयारीसाठी तसेचं चालुक्याधीशांच्या स्वागतासाठी राजकुमारींनी लवकरात लवकर महालात परतावे अशी ‘विनंतीही’ सेवकांकरवी त्यांनी वरदायिनीला केली!

हे सारं तिला अपेक्षितंच होतं. ती महामात्यांना पूर्णत: जाणून होती, त्यांची धाव कुठवर जाणार हेही तिला ठाऊक होतं!

त्यामुळेचं तिने अचूक आज्ञा कविराजांना आधीचं देऊन ठेवल्या होत्या. आता तिच्यावर जरी पाळत असली तरी कविराज आणि नगरीतले तिचे विश्वासू त्यांची भूमिका अचूक निभावणार याची वरदायिनीला खात्री होती! हे सर्व मार्गी लावून मग दुसऱ्या दिवशी ती महालात परतली. आता राजकुमारी डोळ्यांसमोरच असणार असल्याने महामात्यही थोडेसे निश्चिंत झाले आणि विवाहाच्या व स्वागताच्या तयारीत व्यग्र झाले!

त्यांना कुठे ज्ञात होतं वरदायिनी काहीही न करता सर्व काही करतेय ते..

.....

दुसऱ्या दिवशी थोडंसं लवकरच, ठरलेल्या वेळेच्या आधी मनवा मंदिरात आली. रात्रभर तिला झोप म्हणावी तशी आलेली नव्हतीचं.. एकीकडे रोहन आणि दुसरीकडे मंदिर.. दोन टोकांचे हे दोन विचार तिच्या डोक्यात ठाण मांडून बसले होते. शेवटी ती उठली आणि सोबत तिने आणलेल्या नोट्स उघडल्या, कुठे काही दुवा सापडतोय का पाहण्यासाठी. तेव्हा, गुप्तोत्तर कालीन कवी आणि काव्य या विषयावरील जुन्या कुठल्या तरी लेक्चरमध्ये काढलेल्या नोट्स तिला वहीत दिसल्या. त्यातल्या एका काव्य तुकड्याने तिचं लक्ष चांगलंच वेधून घेतलं. त्या ओळी वाचल्यावर तिला काहीतरी क्लिक झाल्या सारखं वाटलं.. तिने त्या नोट्स पूर्ण वाचुन काढल्या. प्राकृत मराठीचा अंश असलेली ती रचना होती चालुक्यकालीन कवी नीलवदन यांची,

*पलाश रंगी, पाषाण शयनी*
*गर्भनाळेतुनी आवतरली मृगनयनी ।*
*रक्ताभिषेक शिवसूर्यचरणीं*
*सुभग शुचित मंगल ही वरदायिनी ।।*

पलाश.. पाषाण.. शिव.. सूर्य.. हे सगळं नक्कीचं तिच्या त्या शिवमंदिराशी संबंध सांगणारं वाटलं होतं. भारतात सूर्य मंदिरं

अगदी बोटांवर मोजण्याइतकी आहेत. त्यात पळस, पाषाण.. म्हणजे आता तिला खात्रीचं वाटू लागली की या ओळींमधले शिवसुर्य म्हणजे हे आपलं मंदिरचं! पण त्या ओळींचा अर्थ काही तिला लागेना. गर्भनाळेतुनी म्हणजे? आता तिला हे कोडं सोडवण्याची प्रचंड घाई झाली. त्यामुळेच सकाळी लवकर आवरुन ती मंदिरात येऊन पोचली होती, प्रोफेसर प्रकाश खांडेकरांची वाट पहात. प्राचीन भारतातील कला आणि स्थापत्य या विषयातले ते तज्ञ होते. मनवाची या विषयातली तळमळ पाहुन त्यांनी तिला मार्गदर्शन करायचं ठरवलं होतं..

या सगळया विचारांमध्ये गढलेली असताना तिचं लक्ष मंदिराच्या बाह्य भिंतीवरच्या सगळयात तळाशी असलेल्या शिल्प पट्टीकडे गेलं, त्यावर हत्तीची एकासारखी एक सलग तोंडं कोरलेली होती. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या सगळया हत्तीची सोंड मात्र कोणीतरी नंतर छाटल्यासारखी दिसत होती.. तिला गम्मत वाटली, तिने पूर्ण मंदिराला प्रदक्षिणा मारून पाहिलं, सगळया हत्तीची सोंड छाटलेली होती, शिवाय एक.. गर्भगृहाच्या मागच्या भिंतीवर मधोमध येणारा हत्ती आणि त्याची सोंड दोन्हीही सुस्थितीत होते. या गोष्टीचा उलगडा काही तिला होईना. कोणा परधर्मीय आक्रमकाने नंतर मंदिराची विटंबना करण्यासाठी म्हणून हे केलेलं असेल का अशी शंका तिच्या मनात आली पण मग लगेच तिला

वाटलं, विटंबना करायचीच असती तर त्यांनी शिवलिंगाची केली असती, मंदिर उद्ध्वस्त केलं असतं पण ते तसं नव्हतं, हे काहीतरी वेगळंच असलं पाहिजे असं म्हणत ती निरखून त्या हत्तींकडे पाहत होती तेवढ्यात तिच्या कानांवर ओळखीचा आवाज पडला,

'आज भल्या सकाळीच उठून निरीक्षण चालू आहे!' गळयात कॅमेरा अडकवलेला अनिकेत तिच्या मागे उभा होता.

वळून त्याच्याकडे पाहत जरा आश्चर्यानेच ती म्हणाली,

'अरे, तुझं शूट तर संपलं नं कालच!'

'हो ते संपलं कालच.' तो म्हणाला.

'मग आज पुन्हा इथे काय सहल म्हणून आला आहेस वाटतं!'

जरासं हसून अनिकेत म्हणाला,

'काल जे शूट मी केलं ते पैशांसाठी, आणि आज जे मी करणार आहे ते माझ्या स्वतःसाठी! या मंदिराने का कोणास ठाऊक वेड लावलंय मला. आज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या प्रत्येक फेज मधले याचे फोटोज काढायचेत मला आणि ड्रोनने थोडंसं टाइम लॅप्स पण शूट करायचंय म्हणून आलोय.. आज सुद्धा! तसा मी नेहमीचं येत असतो इथे.'

'ओह दॅट्स नाईस! गो अहेड देन..' मनवा उत्तरली.

'Yes off course, I'm going ahead. but it seems like you are stuck somewhere and struggling to find a way out!'

अनिकेत तिच्याकडे रोखून पाहत तिला विचारत होता. त्यावर थोडंसं दचकुनच मनवाने विचारलं,

'म्हणजे?' तितक्यात मागून कानावर आवाज आला,

'हॅलो मनवा!', तिने मागे वळून पाहिलं तर प्रोफेसर खांडेकर समोर उभे. तिने गडबडून त्यांना नमस्कार केला आणि म्हणाली,

'हॅलो सर! नाईस टू मीट यू! मी तुमचीच वाट पाहत होते.'

तिला हसून त्यांनी उत्तर दिलं आणि त्यांची नजर अनिकेतकडे गेली, मग मनवाने त्यांची आणि अनिकेतची एकमेकांशी ओळख करून दिली!

आणि मग तो सारा परिसर फिरुन तिथले बारीक बारकावे तिला समजाऊन सांगताना, त्या पडक्या तटबंदीकडे आणि एकूणच मंदिराच्या दुरवस्थेकडे पाहत प्रोफेसर म्हणाले,

'लुक ॲट द मिझरी! हा इतका प्राचीन ठेवा आहे आणि त्याची हि अवस्था! मी आजवर शेकडो पत्रं पाठवली, पण काही उपयोग

झाला नाही. इथे खरंतर संशोधनाला खूप वाव आहे पण इंस्टिट्यूट लक्ष द्यायला तयार नाही.'

मनवाने मग सरांवर प्रश्नांचा भडीमार केला. तिच्या सगळ्या शंका ती त्यांना विचारू लागली. अगदी मंदिराच्या वादग्रस्त कालावधीपासून, कवी नीलवदनचं काव्य ते हत्तींच्या तुटलेल्या सोंडेपर्यंत सगळे प्रश्न तिने त्यांना विचारले. आणि मग तिच्या लक्षात आलं कि त्यांच्याकडे पण या सगळ्यांची समाधानकारक उत्तरे नव्हती. कारण यावर आजवर काही संशोधनच झालेलं नव्हतं. कवी नीलवदन विषयी मात्र बरंचसं त्यांनी तिला सांगितलं, तो सेवण राज्याशी निगडित असावा असं त्यांच्या बोलण्यातून तिला जाणवलं, पण ठामपणे काही बोलावं असे पुरावे उपलब्ध नव्हते. तुटलेल्या सोंडेंविषयी त्यांनी सांगितलेली कथा तिला फारच रंजक वाटली. आजूबाजूच्या प्रदेशामध्ये लोक हि कथा एकमेकांना सांगतात, पण ती दंतकथा असावी कारण त्यासंबंधी काही पुरावे प्राप्त नसल्याचंही ते म्हणाले. पूर्वी कोण्या एका राजकुमारीने इथल्या हत्तीच्या सोंडेमध्ये दुर्मिळ हिरा लपवला होता म्हणे, तो शोधण्यासाठी  काही चोरांनी सगळ्याच हत्तींच्या सोंडी छाटल्या अशी ती कथा होती. त्या राजकुमारीचं नाव तिने सरांना विचारलं .

पण ते म्हणाले, त्या राजकुमारीच माहित नाही पण या प्रदेशात ज्या सेवण वंशाचा उदय झाला त्या वंशात मात्र एक हरहुन्नरी राजकुमारी होऊन गेली, वरदायिनी नावाची. पण काही दुर्मिळ उल्लेखांशिवाय तिच्याविषयी काही जास्त माहिती उपलब्ध नाही असं ते म्हणाले.

आणि मग मनवाला एकदम सगळं लिंक होत असल्याचं जाणवलं.. सेवण राज्य.. राजकुमारी वरदायिनी.. कवी नीलवदन.. हे मंदिर.. आणि ते काव्य..

पण गर्भनाळ म्हणजे काय? तिला या कोड्याचा उलगडा पडेना. प्रोफेसर खांडेकरांनाही या गोष्टी खूपचं इंटरेस्टिंग वाटल्या. आपण याचा नक्की पाठपुरावा करु असं ते मनवाला म्हणाले..

इतक्यात अनिकेत धावत त्यांच्यापाशी येताना त्यांना दिसला..

‘मनवा चल लवकर तुला काहीतरी दाखवाचंय..’

तो धपापत बोलत होता.

‘अरे पण काय झालं, तु असा पळत..’

तिचं बोलणं मध्येचं तोडत, तुम्ही चला दोघेही लवकर म्हणत तो दोघांनाही गर्भगृहाकडे घेऊन गेला.

गर्भगृहात गेल्यावर मात्र दोघेही अवाक् झाले!

शिवलिंगाच्या अग्नेयेला कोपऱ्यात, पुरातत्व विभागाने डागडूजी करताना घातलेल्या फरशीचा एक तुकडा भंगल्यासारखा दिसला, म्हणून त्याला जवळून पाहण्यासाठी अनिकेत कोपऱ्यात जात असताना त्याचा पाय निसटला आणि तो जोरात त्याचं भंगलेल्या फरशीवर पडला. आणि आधीचं तडा गेलेली ती फरशी तुकडे होऊन सरळ हातातचं आली. ती कोणाच्या पायात घुसू नये म्हणून तो तुकडे गोळा करू लागला. उंदरांमुळे की काय कोण जाणे पण खालचा थर त्याला जरासा पोघर वाटला. त्याने हाताने तिथली माती बाजूला केली. बरीच माती बाजूला केल्यावर त्याला खाली एक लालसर दगड दिसला. कुतूहलाने त्याने अजून उकरुन पाहिलं तर खरंच तिथे चौकैनी आकाराचा आडवा लाल दगड होता. आणि नीट पाहिल्यावर त्याला जाणवलं, मंदिरातले इतर ठिकाणचे दगड जसे एकात एक इंटरलॉक्ड आहेत तसा हा नाही. हा मातीत रुतून बसलाय. अजून थोडी माती बाजूला करुन त्याने तो दगड जरा हलवला. तर काय आश्चर्य! तो चांगला हलत होता. आजूबाजूचं उकरुन जरा मोकळं केलं तर सहज सुटून वेगळा होईल असा. आणि मग त्याच्या लक्षात आलं हे काहीतरी वेगळंच आहे. मग तो धावत जाऊन मनवाला घेऊन आला.

मनवा आणि प्रोफेसर खांडेकर यांच्या लगेचं लक्षात आलं की ते एका भुयाराचं ओपनिंग आहे. आणि ते विस्मयाने भरुन गेले. मंदिराच्या गर्भगृहात चक्क एक भुयार होतं!

खांडेकरांनी लगोलग चार-दोन फोन केले आणि दुसऱ्या दिवशी पुरातत्व विभागाची टीम मंदिरात हजर झाली.

पण इकडे मनवा मात्र चांगलीचं चकित झाली होती.. तिच्या मनानं नकळत प्रश्न उमटला.. 'गर्भ'नाळ म्हणजे हे गर्भगृहातलं भुयार तर नसेल ना?

ठरल्याप्रमाणे पौर्णिमेदिवशी चालुक्य सम्राट आदित्येय नगरीत येऊन दाखल झाले. महाराज मणिचंद्र मोठ्या लवाजम्यासह त्यांना सामोरे गेले. चालुक्य सम्राटाचं अतिशय भव्य-दिव्य असं स्वागत करण्यात आलं!

पितृछत्र अगदी तरुण वयात हरवलेले महाराज आदित्येय पराक्रमी तर होतेचं पण एक सुसंस्कृत आणि संवेदनशील राजे अशीही त्यांची ख्याती होती. लहान वयात मोठ्या जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर येऊन पडल्या होत्या. वडील

निवर्तल्यावर राज्याची घडी विस्कळीत न होऊ देता कारभारावर आणि राज्यावर घट्ट पकड ठेवण्याच्या यशस्वी प्रयत्नांमध्ये, स्वत:च्या खासगी आयुष्याकडे लक्ष देण्यास त्यांना अवकाशच मिळाला नव्हता. पण आता जेंव्हा त्यांच्या पराक्रमापुढे मान तुकवून सेवण राजाने आपल्या राजकुमारीशी विवाहाचा प्रस्ताव आदित्येयांपुढे ठेवला तेंव्हा तो प्रस्ताव त्यांनी आनंदाने स्वीकारला, राजकुमारी वरदायिनीची ख्याती त्यांनी ऐकलेलीचं होती.. तिला भेटायची त्यांना उत्सुकताही होती.

इकडे वरदायिनी मात्र वेगळ्याच कामांमध्ये व्यस्त होती. महाराज आदित्येय काळे कि गोरे हे पाहण्यातही तिला रुची नव्हती! ती पेटून उठली होती. आपल्या सभोवतीचं जग जेव्हा कुठल्या न कुठल्या कारणाने सतत आपल्या क्षमतांकडे दुर्लक्ष करत आपल्या संधी नाकारत जातं, तेव्हा आपण दुप्पट आवेशाने सर्व शक्ती पणाला लावत आपलं अस्तित्व सिद्ध करण्याचे प्रयत्न करत जातो तशी! तिची अस्मिता तिच्यासाठी सगळ्यात वर होती आणि ते योग्यही होतं! त्यामुळेचं चतुराई, धाडस आणि पराक्रम या तिन्हींचा योग साधत ती, तिला कमी लेखणाऱ्या त्या पूर्ण व्यवस्थे विरुद्ध दंड थोपटून उभी राहणार

होती..   समोर कोण उभं आहे हे तिच्यासाठी महत्वाचं नव्हतंच! ती लढत होती ते तिच्या न्याय्य हक्कांसाठी!

महाराज आदित्येय नगरात दाखल झाल्यावर वरदायिनी वरची बंधनं अजून वाढली. तिला आता तिच्या कक्षातून बाहेर पडण्याचीही बंदी करण्यात आली. पण त्यामुळे राजकुमारीचं तसं काहीही अडणार नव्हतं, तिचे सारे व्यवहार पूर्ववत चालू होते! अतिशय दूरदर्शी असलेल्या वरदायिनीने संकटकाळात उपयोगी पडेल म्हणून २-३ वर्षांपूर्वीचं महालातल्या तिच्या कक्षातून, थेट वनातल्या शिवमंदिरात पोचणारं भुयार तयार करून घेतलं होतं , त्यासाठी या कामात कुशल असणारे कामगार तिने थेट नर्मदेपलीकडच्या प्रदेशातून बोलावून घेतले होते. आणि त्या भुयार मार्गाची कल्पना तिच्या व्यतिरिक्त केवळ आणखी दोघांनाच होती, एक म्हणजे कविराज नीलवदन आणि दुसरे वरदायिनीच्या विश्वासातले सेनापती वीरदमन! या तिघांव्यतिरिक्त ही गोष्ट अन्य कोणालाही ज्ञात नव्हती! दरबारातल्या मुत्सद्दी मंत्रिगणांना काहीही वाटत असलं तरी वरदायिनी त्या साऱ्यांना पुरून उरणारी होती! ती आता केवळ योग्य संधीची वाट पाहत होती. आणि ती तिला लवकरच मिळाली!

महाराज आदित्येय अभिरुची संपन्न होते. त्यांनी राजकवी आणि राजगायकाला भेटण्याची इच्छा दर्शवली. आणि ही अशी चालून आलेली संधी राजकवी नीलवदन यांनी दवडणे शक्यच नव्हते. त्यांनी त्यांच्या प्रतिभेने आदित्येयाना मोहित केलं. आणि बराच वेळ त्यांच्यासमवेत घालवून मिळालेला सारा वृत्तांत ते रात्री मंदिरात येऊन वरदायिनीला देऊ लागले. वरदायिनी  रात्रीच्या वेळी भुयारातून मंदिरात येऊन तिच्या माणसांना भेटायची आणि पुढच्या योजना आखून आदेश द्यायची. तिने आदित्येयांची, त्यांच्या सैन्याची, चालुक्य राजधानीची सर्व माहिती गोळा केली होती. आणि त्याप्रमाणे तिची योजनाही आता तयार होती. महाराज आदित्येय इकडे येताना जवळपास त्यांच्या एकूण सैन्याच्या पाऊण प्रतिशत सैन्य घेऊन सेवण राज्यात आलेले होते. त्यामुळे आता चालुक्य राजधानीत केवळ एक चतुर्थ सैन्य उपस्थित होते. याचा अचूक फायदा घेत वरदायिनीने तिच्या खाजगी आणि गुप्त दोन्ही सैन्य दलांना सेनापती वीरदमन यांच्या नेतृत्वाखाली गुप्तरित्या आणि भिन्न मार्गाने चालुक्य राजधानीकडे केंव्हाच रवाना केलं होतं. आता फक्त महाराज आदित्येयांशी सामना होणं बाकी होत. कवी नीलवदन कडून आलेला सारा वृत्तांत ऐकल्यावर तिने तिची योजना साऱ्यांना सांगितली.. आणि सर्व

नियोजन मार्गी लावल्यावर रात्री उशिरा ती महालात परतली. उद्याचा दिवस सगळ्यांसाठीच खूप महत्वाचा असणार होता!

.....

प्रोफेसर खांडेकरांनी त्यांचा वट वापरून पुरातत्व खात्याकडून मंदिरातल्या त्या भुयार सदृश्य जागेत खोदकामाची परवानगी मिळवली आणि लगोलग कामाला सुरुवात देखील झाली. दोन दिवसांसाठी म्हणून आलेल्या मनवाने तिचा मुक्काम आणखी चार दिवस वाढवला! आईने थोडेसे आढेवेढे घेतले पण मग नंतर ती काही म्हणाली नाही. वरवर जरी मनवाने स्वतःला त्या कामात गाडून घेतलेलं असलं तरी आतून मात्र तिला सारखं जाणवत होतं, ती इथे आल्यापासून रोहनने एक साधा फोनही तिला केलेला नव्हता. आल्या आल्या तिनेच त्याला पोचल्याचा मेसेज पाठवला होता आणि त्यावर त्याचा 'K ' असा आलेला रिप्लाय.. एवढंच काय ते त्यांचं संभाषण! एकेकाळचं एक अतिशय सुंदर नातं आणि त्याची आज झालेली हि अवस्था मन हेलावणारी होती! क्षणभरासाठी तिला वाटलं देखील, आपलं काही चुकत तर नाहीये नं .. पण मग दुसऱ्या मनाने तो विचार लगेच झटकला. तिला त्या

विचाराचाच राग आला.. आपलं स्वतःची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी धडपडणं, स्वतःची पॅशन जपणं किंवा अगदी सोप्या  शब्दात सांगायचं तर स्वतःच्या आयुष्यात आपल्या स्वतःला फस्ट प्रायॉरिटी देणं या गोष्टीचं आपल्याला गिल्ट यावं? आणि तेही केवळ रोहन तसं म्हणाला म्हणून??

मनवाला तिच्यासमोरची धुरकट वाट थोडीशी स्पष्ट होत असलेली जाणवली!

मंदिरातलं खोदकाम जोरात चालू होतं, प्रोफेसर खांडेकर स्वतः जातीने यात लक्ष घालत होते. मनवा तर होतीच अव्याहत तिथे, प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करत! साधारण ५-६ फूट खाली खोदल्यावर आता अगदी स्पष्ट झालं  होतं कि तिथे नक्की भुयारच आहे.. पण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यादिवशी खालच्या मातीच्या ढिगाऱ्याचा अभ्यास करताना मनवाला त्यात अर्धवट तुटलेल्या अवस्थेत असलेलं एक ताम्रपत्र सापडलं! आणि तो एक निर्णायक क्षण होता. त्याक्षणी जरी त्याच्यावरचं काही वाचता येण्यासारखं नसलं तरी त्यावर प्रक्रिया करून मजकूर शोधणं, तिच्या क्षेत्रातल्या लोकांसाठी काही अवघड काम नव्हतं. तिने लगेचं ते पुढच्या प्रक्रियेसाठी पुण्याला पाठवलं आणि १-२ दिवसांनी तीही पुण्याला परतली!

......

कवी नीलवदन दुसऱ्या दिवशी सकाळी महाराज आदित्येयांकडे गेले, त्यांना पाहून आनंदित होत महाराज म्हणाले,

'या कविराज या! आम्ही तुमचाच विचार करत होतो. तुमच्या काव्याने आम्ही मोहित झालो आहोत.. बोला! आज सकाळीच येणं केलंत?'

त्यावर कविराज म्हणाले,

'धन्यवाद महाराज! तुम्हाला इथलं शिवमंदिर दाखवण्याची मनीषा होती. अतिशय सुरेख मंदिर आहे, तुम्हाला अवश्य आवडेल! तुमची इच्छा असल्यास तिकडे जाण्याची मी व्यवस्था करतो!'

कविराजांच्या या अगत्याला प्रतिसाद देत आदित्येय म्हणाले,

'अवश्य! जाऊ आपण. '

राजकवी नीलवदन नी त्यांचं काम चोख केलं!

पण याची वार्ता महामात्यांपर्यंत पोचली. सावधगिरीचा पवित्रा घेत तेही मग त्या दोघांसोबत मंदिराकडे निघाले. सूर्यास्ताच्या दोन घटका आधी, ठरलेल्या वेळेला कवी नीलवदन महाराज आदित्येय आणि महामात्यांसह मंदिरात पोचले!

मंदिराच्या गर्भगृहात राजकुमारी वरदायिनी शुभ्र पुरुषी वेश परिधान करुन, शिवलिंगासमोर ध्यानमुद्रेत बसली होती! तिचे काजळी लांबसडक केश आज मोकळे नव्हते, ललाटी एक चंद्रकोर सोडली तर बाकी काहीही आज रोजच्या सारखं नव्हतं. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचं आरस्पानी तेज उतरलं होत आणि त्या तेजवलयामुळे ती अधिकच प्रखर आणि राजस दिसत होती.

महाराज आदित्येयानी मंदिरात प्रवेश केला.. त्यांच्या मागोमाग महामात्यही आत आले. कविराज नीलवदन मात्र सभामंडपाच्या दाराशीच उभे राहिले.

आत येताच त्या शुभ्र पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून क्षणभर ते दोघेही थबकले. पुढे होत महामात्यानी विचारलं,

'कोण आहे तिकडे? महाराज आदित्येयांसमोर अभिवादन न करता बसून राहण्याचं हे धाडस कोणाचं?'

त्यांच्या बोलण्याकडे पुन्हा संपूर्ण दुर्लक्ष करत वरदायिनी तशीच बसून राहिली. महामात्य आता चिडून पुढे सरसावणार इतक्यात, महाराज आदित्येयानी त्यांना थांबवलं, आणि ते स्वतः गर्भगृहाकडे निघाले.. ते गर्भगृहाच्या दारात पोचलेले असताना, वरदायिनी उठली आणि वळून आदित्येयासमोर उभी राहिली. ते क्षणभर तिच्याकडे पाहतच राहिले तिच्या त्या भेदक नजरेने त्यांना प्रभावित केलं..

राजकुमारीला पाहून महामात्य विस्मयीत आणि भयभीत झाले.. त्यांना कळेना, आपण केलेल्या इतक्याकडेकोट बंदोबस्तातून निसटून वरदायिनी इथे पोचलीच कशी!

.....

पुण्यात आल्यावर प्रथम मनवाने त्या ताम्रपटाचा पाठपुरावा केला, त्यासंदर्भात बऱ्याच तज्ज्ञांना ती भेटली. अभ्यासा अंती त्यावरचा मजकूर वाचण्यात त्यांना यश आलं. त्यावरचे दोन

उल्लेख अगदी स्पष्ट होते.. एक म्हणजे चालुक्यधीश आदित्येयांचा उल्लेख आणि दुसरा उल्लेख होता, 'राणी वरदायिनीचा'. मनवाला तिचं कोडं सुटत असल्यासारखं वाटलं. पूर्ण मजकुराचा अर्थ लावण्याचं काम अजून चालू होतं. मधल्या काळात कार्बन डेटिंगचे रिपोर्टही आलेले होते, त्यावरून ते भुयार तरी इसवी सनाच्या नवव्या शतकात खोदलेलं होतं याचा उलगडा सर्वांना झाला. आता मनवा प्राच्यविद्या संस्थेतल्या मोठ्या लायब्ररीमध्ये येऊन चालुक्यधीश आदित्येय आणि राणी वरदायिनी विषयीचे संदर्भ गोळा करण्याच्या कामाला लागली. आणि त्या दिवशी अशीच पुस्तकांमध्ये गढलेली असताना तिचा फोन वाजला.. स्क्रीनवर नाव होतं रोहनचं..

.....

'आपला परिचय?'

आदित्येय वरदायिनीला विचारत होते. त्यांनी तिच्याविषयी आजवर ऐकलेलं जरी असलं तरी प्रत्यक्षात अजून पाहिलेलं नव्हतं.

त्यांच्या त्या प्रश्नाला तिच्या तीक्ष्ण नजरेने उत्तर देत वरदायिनी म्हणाली,

'जिच्याशी विवाह करण्यासाठी जिच्या संमतीशिवाय आपण इथे आला आहात.. राजकीय पटावरची जी केवळ एक देव-घेवीची वस्तू गणली गेली आहे.. आणि राज्याच्या तथाकथित हितासाठी जिला 'देऊन' टाकण्यात या सेवण राजदरबाराला आणि उपहार स्वीकारावा तसं तिला स्वीकारण्यात तुम्हाला, पराक्रम वाटतो आहे ती.. राजकुमारी वरदायिनी!'

तिच्या या उत्तराने स्तिमित होत आदित्येय तिच्याकडे पाहत राहिले..

परिस्थिती हाताबाहेर जातेय हे लक्षात येऊन सारवासारव करण्यासाठी महामात्य पुढे झाले, ते काही म्हणणार इतक्यात, राजकुमारी वरदायिनीची जळजळीत नजर त्यांच्यावर पडली, त्यांना उद्देशून ती गरजली,

'सांभाळून महामात्य! सेवण देशाच्या भावी राणीवर सैनिकांकरवी पळत ठेवण्याचा अपराध तुम्ही केलेला आहे. याची शिक्षा तुम्हाला ज्ञात असेलच! ती आत्ता इथे अमलात आणण्यास भाग पाडू नका आम्हाला!'

तिच्या त्या शब्दांनी महामात्य चांगलेच चरकले.

या सगळ्या प्रकाराने विस्मयीत होऊन, महाराज आदित्येय म्हणाले,

'हा काय प्रकार आहे राजकुमारी!'

त्यावर तिच्या जवळची तलवार त्यांना देत वरदायिनी म्हणाली,

'हा प्रकार काय आहे ते तुमच्या लक्षात यायला हव होतं एव्हाना.. राजकुमारी वरदायिनीला जिंकणं इतकं सोपं नाही चालुक्यधिराज! मी तुम्हाला द्वंद्व युद्धाचं निमंत्रण देतेय.. माझ्याशी विवाहाची स्वप्नं रंगवण्या आधी आत्ता ह्या क्षणी इथे या पाषाणावर, मला हरवून दाखवा! मी हरले तर त्याक्षणी माझा प्राण त्यागेन आणि जिंकले तर सेवण राजसिंहासनावर माझा राज्याभिषेक करूनच तुम्ही तुमच्या राज्यात परताल!'

'आणि आम्ही यास नकार दिला तर?' महाराज आदित्येय उत्तरले.

'तुमच्याकडे दुसरा पर्यायच नाही! इथून राजदरबारापर्यंत आमचे सैनिक जागोजागी उभे आहेत! आणि शिवाय आमच्या सेनापतींनी तुमच्या राजधानीला एव्हाना वेढाही दिलेला असेल!'

राजकुमारीच्या उत्तराने आदित्येय चांगलेच स्तिमित झाले. क्षणभर वरदयिनीच्या चातुर्याने आणि धाडसाने ते प्रभावितही झाले. तिच्या पराक्रमाचं दर्शन मात्र त्यांना अजून व्हायचं होतं.

आदित्येयानी राजकुमारींचं आव्हान स्वीकारलं.. आणि दोघेही सभामंडपाच्या बाहेर पाषाणावर पश्चिमेला कललेल्या सूर्याच्या साक्षीने एकमेकांसमोर तळपत्या तलवारी घेऊन उभे राहिले!

....

थोड्याशा नाराजीनेच मनवाने रोहनचा फोन घेतला तर तो उत्साहाने बोलत होता,

'congratulations मनवा! आज पेपरमध्ये तुझं नाव वाचलं. त्या मंदिरात सापडलेल्या पुरातन गोष्टींविषयी छापून आलंय आज. तू त्यात महत्वाची भूमिका पार पाडलीस असंही  लिहीलंय त्यात! आई-पपा पण कौतुक करत होते तुझं.'

त्याच्या त्या बोलण्याचं आश्चर्य वाटून मनवा किंचित उपहासाने म्हणाली,

'ओह इज  इट! कालपर्यंत तर तुला हे सगळे भिकेचे डोहाळे वाटत होते नं रोहन!'

'सोड नं आता मनवा! मला सांग आपण भेटूया का आज?' रोहन म्हणाला.

'हो भेटावं तर लागेलच. भेटू आपण. पण उद्या! आज मला थोडंसं काम आहे.' मनवा उत्तरली.

त्यावर 'ठीक आहे' म्हणून रोहनने फोन ठेवला.

मनवाला त्याच्या बोलण्याचं आश्चर्य वाटण्यापेक्षा खेद अधिक वाटू लागला. इतके दिवस मी काय करतेय याची त्याला दाखल घ्यावीशी वाटली नाही आणि आता पेपरमध्ये नाव वाचून हा माझं अभिनंदन करतोय. तिला त्याच्या वागण्यात खूप विरोधाभास जाणवला. हे सारे विचार बाजूला सारत ती पुन्हा पुस्तकांमध्ये गढून गेली. आणि जवळपास अर्धी लायब्ररी पालथी घातल्यावर एका अतिशय जुन्या आणि दुर्मिळ चालुक्य कालीन ग्रंथामध्ये तिला त्या दोघांचा उल्लेख सापडला.. ती आनंदातिशयाने फुलून गेली!

....

महाराज आदित्येयाना राजकुमारीशी द्वंद्वयुद्ध करणं म्हणजे त्यांच्या डाव्या हाताचा मळ वाटत होतं. त्यांनी तलवार उचलली आणि सिद्ध अवस्थेत वरदायिनी समोर येऊन ते उभे ठाकले. वरदायिनीने त्यांच्याकडे रोखून पाहिलं, दोघांनी एक दीर्घ श्वास घेतला आणि आदित्येयाना समजायच्या आत वरदायिनीची तलवार अतिशय चपळाईने त्यांच्या मानेजवळ येऊन पोचली. तिच्या त्या कौशल्याने चकित होऊन आदित्येयानी तितकंच चपळ प्रत्युत्तर तिला दिलं पण त्यांच्या चांगलंच लक्षात आलं की हे द्वंद्व अटीतटीचं होणार! आणि मग जवळजवळ तासभर दोघांच्या प्रखर तलवारींचा आवाज परिसरात घुमत राहिला.. कविराज नीलवदन आणि महामात्य डोळ्यात प्राण आणून ते युद्ध पाहत होते.

महाराज आदित्येय अतिशय पराक्रमी होते त्यांना रणांगणात धूळ चारणं सोपं काम नव्हतं पण वरदायिनी आज अभूतपूर्व तेजाने तळपत होती, तिला हरवणं साक्षात तिच्या देवालाही कठीण वाटावं इतकी! तिची काटक शरीरयष्टी आणि दुर्दम्य इच्छाशक्ती तिला थकू देत नव्हती. पण तिच्या

तलवारीच्या चपळ वारांनी  महाराज आदित्येय मात्र थकू लागले.. आणि हीच संधी साधत वरदायिनीने एक निर्णायक वार केला, तशी महाराज आदित्येयांची तलवार दहा फूट दूर जाऊन पडली, आणि ते स्वतः तोल जाऊन खालच्या पाषाणावर कोसळले. महाराज आता हरणार हे लक्षात येऊन महामात्य धावत जाऊन वरदायिनीला मागून विचलित करायला धावले.. खाली कोसळलेल्या महाराजांच्या मानेवर रोखण्यासाठी वरदायिनीने तलवार उचलली तसं तिला मागून धावत येणाऱ्या महामात्यांची सावली दिसली आणि तिचा वेध घेत तिने तिच तलवार विरुद्ध दिशेने तत्क्षणी जोरात फिरवली आणि चर्र्र आवाज करत महामात्यांचं शीर क्षणार्धात धडावेगळं होऊन सूर्यमंदिरासमोर जाऊन पडलं, आणि त्यांचा थरथरणारा देह रक्ताच्या थारोळ्यात खाली पाषाणावर कोसळला..  मंदिराला रक्ताभिषेक घडला!

वरदायिनीने क्षणात मागे वळून, सावरण्याच्या तयारीत असलेल्या आदित्येयांच्या मानेवर तिची रक्ताने माखलेली तलवार धरली.. मावळतीची किरणं अंगावर पडून वरदायिनी अधिकच उजळून निघत होती.. तिचं ते रूप पाहून आदित्येयानी तिच्यासमोर हात जोडून स्वतःचा पराभव पत्करला!

आणि हे सर्व याची देही याची डोळा पाहत असलेल्या कविराजांच्या तोंडातून नकळत पुन्हा त्याच काव्यपंक्ती बाहेर पडल्या..

*पलाश रंगी, पाषाण शयनी*
*गर्भनाळेतुनी आवतरली मृगनयनी ।*
*रक्ताभिषेक शिवसूर्यचरणीं*
*सुभग शुचित मंगल ही वरदायिनी ।।*

आणि मग मानाने वरदायिनीने नगरात प्रवेश केला. यथावकाश तिचा राज्याभिषेक पार पडला. प्रजाजनांनी आनंदाने जल्लोष केला. राज्याभिषेकानंतर महाराज आदित्येय जायला निघाले तेव्हा वरदायिनीने त्यांचा यथायोग्य सन्मान केला. त्यांनीही तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.. आणि हो, त्यांनी पुन्हा एकदा तिच्यासमोर विवाहाचा प्रस्ताव ठेवला.. तिच्या सगळया अटी मान्य करून! अगदी ते त्यांच्या राज्यात आणि वरदायिनी तिच्या राज्यात राहून संसार करण्याची तयारीही त्यांनी दाखवली.. पण आता निर्णय राणी वरदायिनी घेणार होती, स्वतःच्या मर्जीने!

.......

त्या जुन्या ग्रंथात मनवाला महाराज आदित्येय आणि राणी वरदायिनीच्या विवाहाचे उल्लेख आढळले, आणि कवी नीलवदनने त्या दोघांवर केलेलं काव्यही सापडलं. राणी वरदायिनीची ती गोष्ट वाचून मनवा भारावून गेली.. त्या प्राचीन विजिगीषू राणीचा पराक्रम पाहून कुठेतरी मनवाला तिच्या आतली विजीगिषाही जागृत होत असलेली जाणवली..

आणि मग दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे, ती रोहनला भेटायला आली.

ती आल्या आल्या रोहन तिला सॉरी म्हणाला.

पण त्याला पुढे काहीही बोलू न देता ती शांतपणे म्हणाली,

'रोहन, मी खूप विचार केला! तू त्यादिवशी मला म्हणाला होतास नं, तुला नक्की काय हवंय ते आधी ठरव म्हणून! पण मग माझ्या लक्षात आलं, मला काय हवंय ते माझं खूप आधीपासूनचं ठरलेलं आहे! मला इंडोलॉजीस्ट व्हायचंय हे मी वयाच्या सोळाव्या वर्षीचं ठरवलं होतं. तुला ते माहितही होतं. मग तुला आत्ताच या सगळ्याचा त्रास का व्हावा?

कारण रोहन तू बदललायस.. तुझं विश्व बदलत चाललंय.. आणि त्यामुळे तू मलाही बदलू पाहतोयस! पण ते शक्य नाहीये.. मी केवळ तुला आज वाटतंय म्हणून स्वत:ला बदलू शकत नाही आणि बदलणारही नाही! काय माहीत उद्या तुला आणखी वेगळं काहीतरी वाटेल.. मी माझं आयुष्य असं तुझ्या आवडी-निवडी आणि मूड्सवर अवलंबून ठेवू इच्छित नाही!

तुझ्या त्या चकचकीत आयुष्याचा मला पूर्वीही मोह नव्हता आणि आताही नाहीये. त्यामुळे त्यात स्वत:ला फिट बसवण्याचा व्यर्थ आणि मूर्ख प्रयत्न मी कधीही करणार नाही!

माझं ठरलेलं आहे, मला माझं पॅशन आणि माझा पूर्वीचा रोहन दोन्ही हवे आहात. मी होते तिथेचं आहे! गोंधळ तुझा झालाय अरे.. तुला कळत नाहीये तुला नक्की काय हवंय ते.. सो ते आधी मनाशी पक्कं कर आणि मग नंतर आपण या विषयावर बोलू!’

तिच्यातल्या त्या नव्याने डोकावणाऱ्या आत्मविश्वासाकडे रोहन चकित होऊन पाहतच राहिला..

# सावली

अंगणात पहाटेची नीरव शांतता होती. पक्षांची कुजबूज सुरू झाली होती. रोजच्या सारखी मुक्ता लवकरच उठली आणि आवरून, दार उघडून अंगणात आली. समोरच्या पडवी कम सोप्याच्या समोर डाव्या कोपऱ्यातला पारिजात फुलांनी डवरला होता. खालच्या लालसर मातीत त्याची शुभ्र-केशरी फुलं आश्वस्तपणे पहुडली होती. हे मोहक दृश्य पाहिल्या शिवाय तिची सकाळ व्हायचीच नाही. त्या फुलांमधून नाजुक पावलांनी वाट काढत ती झाडाच्या बुंध्याशी येऊन पोचली. रात्री पावसाची

हलकी सर येऊन गेल्याची साक्ष त्याची पानं-फुलं देतच होती. तिने मान वर करून एकवार झाडाकडे पाहिलं आणि दोन्ही हातांनी बुंध्याला धरून झाडाला गदागदा हलवलं.. तोच ती लाघव शुभ्र फुलं त्यांच्यावरच्या पावसाच्या थेंबांसकट तिच्यावरून ओघळायला लागली. आणि पाहता पाहता अंगण प्राजक्त फुलांनी भरून गेलं. हे ती रोज करायची आणि रोज तितकीच आंनंदून जायची. त्याच आनंदात वर झाडाकडे पाहत असता, फाटक उघडल्याचा किलकिल आवाज तिच्या कानांवर आला. इतक्या पहाटे कोण आलं असावं म्हणून ती फाटकाकडे पाहू लागली..

जड sack आणि हातातला टॉर्च सांभाळत मल्हार आत आला. आणि समोर पारिजातकाच्या सड्यामध्ये उभ्या मुक्ताला पाहून जरासा गोंधळला. टॉर्च सरळ तिच्यावर धरून त्याने तिच्याकडे पाहिलं.. पारिजातकी शुभ्र रंग, तसाच नाजुकपणा.. पण टॉर्चचा लाईट चेहऱ्यावर पडल्याने, मुक्ताने दोन्ही हातांनी चेहरा झाकून घेतला आणि मल्हारला तो काही दिसला नाही..

"कोण आहे तिकडे? आधी तो टॉर्च खाली घ्या!" मुक्ता जराशी ओरडलीच.

मल्हारने टॉर्च खाली घेतला आणि तो पुढे आला. त्याने आधी त्याचं जड sack सोप्यावर टेकवलं आणि पायऱ्यांवर बसला.

“ओह गॉड.. काही बदललेलं नाहीये इथे अजून. स्लीपरी घाट आणि कच्चे रस्ते.. आधीचा जेट लॅग आणि आता हा घाट लॅग.. वाट लागलीये माझी..”

बोलता बोलता त्याची नजर पुन्हा मुक्तावर गेली.

ती आता चांगलीच चिडली होती. हा कोण मुलगा, सरळ घरात काय शिरतोय आणि वर आपल्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करतोय.. त्या पारिजातकाच्या सड्यातून हळूच वाट काढत ती त्याच्यासमोर येऊन उभी राहिली.

मल्हारने मान वर करून तिच्याकडे पाहिलं.. पहाटच्या सावळ्या प्रकाशात केतकी सारखी शुभ्र मुक्ता, तिच्या त्या नीटस नाजुक नाकावर चढलेला राग, काळेभोर बोलके डोळे, नाजुक जिवणी, त्या अंधारातही उठून दिसणारे तिचे लांबसडक केस.. तो पहातच राहिला. मुक्ता अजून चिडली.

“तुमचं निरखून झालं असेल, तर बोलाल का आता?”

“ओह सॉरी.. हाय, मी मल्हार!” आणि त्याने हात पुढे केला.

त्याच्याकडे दुर्लक्ष करत ती पुढे म्हणाली,

“कोण मल्हार? आणि काय काम आहे?”

“ते.. मी.. मनस्विनी वर्तक..”

मल्हारचं बोलणं मधेच तोडत मुक्ता पुन्हा म्हणाली,

“त्या झोपल्या आहेत. मी काही त्यांना इतक्या अवेळी उठवणार नाही. तुमचं काय काम आहे ते सांगा मला.”

“हो.. हो.. माझ्या इतक्या चौकशा करताय.. तुम्ही नक्की कोण तेही सांगा की एकदा!” मल्हार म्हणाला.

“तुम्ही आमच्याकडे आला आहात, तेही अशा अवेळी! काही न कळवता. मी नाही आलेय तुम्हाला भेटायला. त्यामुळे मी कोण हे तुम्हाला सांगायची मला काहीही आवश्यकता वाटत नाही!” मुक्ता अजूनच ताठर आवाजात म्हणाली.

“ठीक आहे नका सांगू..” असं म्हणत तो सरळ आत जायला निघाला.

तशी लगबगीने पुढे होत तिने त्याला अडवलं,

“थांबा, मी अशी तुम्हाला घरात घुसू देणार नाही! ताई उठल्या की मी निरोप देईन त्यांना. तोवर तुम्ही इथेच बसा.” असं म्हणून तिने सरळ दार आतून लावून घेतलं.

मल्हार चांगलाच गोंधळला. त्याने फोन चेक केला पण बॅटरी डेड होती. सो आता काही पर्याय नाही म्हणत तो तिथेच झोपाळ्यावर आडवा झाला.

मनस्विनी वर्तकांचं घर म्हणजे, सह्याद्रीच्या कुशीत पहुडलेलं एक अतिशय सुंदर आणि कलात्मक दालनच होतं. वीस वर्षांपूर्वी तिने हे स्वप्न पाहिलं आणि आज ते ती जगत होती. एका अतिशय कुशल आणि यशस्वी शास्त्रीय नर्तिकेने तिच्या बहराच्या काळात कलाविश्वापासून स्वत:ला तोडून घेत इथे असं दूर कोकणात येऊन राहणं, तेंव्हा सगळ्यांसाठीच आश्चर्याचा विषय ठरलं होतं. अतिशय मोजक्या, तिच्या कठोर चाचणीत उत्तीर्ण झालेल्या काही खूप थोड्या dedicated विद्यार्थ्यांना ती इथे कथ्थकचं प्रशिक्षण द्यायची, गुरुकुल पद्धतीने! इथून शिकून बाहेर पडलेल्या कलाकारांना मात्र कलाविश्वात प्रचंड मानाचं स्थान मिळायचं. पण मुळात तिचं शिष्य होणं आणि इथे राहून नृत्य-साधना करणं या दोन्ही गोष्टी खूप कठीण होत्या.

सूर्याची कोवळी किरणं खिडकीतून आत आली आणि मनस्विनीला हलकेच जाग आली. थोड्यावेळाने  ती आवरून बाहेर आली. बाहेर टेबलवर रोजच्यासारखा फुलांचा गुच्छ आज तिला दिसला नाही. तिची चाहूल लागून मुक्ताने दोघींसाठी मस्त कॉफी बनवून आणली. तिला कॉफी आणताना पाहून मनस्विनी म्हणाली,

“काय गं, तू का बनवलीस कॉफी? कांताबाई कुठेयत?”

“ताई अगं, काल रात्री फोन नव्हता का केला त्यांनी, त्यांच्या वाडीत पाणी शिरलय म्हणे पावसाचं. थोड्या उशीराच येणारेत आज.” मुक्ता कॉफीचा मग तिच्या हातात देत म्हणाली.

“अरे हो की, विसरलेच बघ मी. आणि काय मॅडम, परीक्षा झाली म्हणून आता पहाट्चा रियाज बंद केला की काय? फुलं आणलेली दिसत नाहीयेत आज..” तिच्याकडे एक हलका कटाक्ष टाकत मनस्विनीने कॉफीची चव घेतली.

“ताई अगं असं करेन का मी? आणि या अलंकार परीक्षेपेक्षा यावर्षीची नॅशनल कॉम्पटिशन माझ्यासाठी जास्त महत्वाची आहे. रियाज केला मी पहाटे!” मुक्ता उत्तरली.

“अहाहा! सुंदर.. कांताबाई राहुदे, मुक्ते उद्यापासून तूच कर कॉफी.. मस्त झालीये!.. अगं, फुलांचा गुच्छ दिसला नाही आज म्हणून म्हटलं मी..” मनस्विनी म्हणाली.

“अगं हो, तुला सांगायचच राहिलं, पहाटे कोणीतरी मुलगा आला होता.. कोण-कशासाठी काही सांगायला तयार नाही, उलट माझ्याशीच उद्धट पणे बोलला. मग मी त्याला सरळ बाहेरच बसवलं. ताई उठल्यावर या म्हटलं.” आपण काहीतरी खूप मोठी कामगिरी केल्यासारखी मुक्ता बोलत होती.

“अरे देवा..” तिचं बोलणं ऐकून काहीतरी महत्वाचं आठवल्या सारखं मनस्विनी हातातली कॉफी खाली ठेऊन बाहेर धावली.

दार उघडून बाहेर पाहिलं तर मल्हार तिथेच झोपाळ्यावर झोपलेला होता. मनस्विनी हळूच त्याच्या जवळ गेली. आणि हा येणार ते आपण असं कसं विसरलो म्हणून स्वत:ला दोष देत हळूच त्याच्या डोक्यावरुन हात फिरवला. दहा-बारा वर्षांपूर्वी तिने त्याला पाहिलं होतं तेव्हा अगदी 15-16 वर्षांचा होता.. पण आता चांगला ऊंच-धिप्पाड आणि मोठा दिसत होता. त्याला झोप लागलेली पाहून ती परत फिरली तर मागून तिचा हात धरत तो म्हणाला,

“मावशे.... जागाय मी!!” आणि मग उठून त्याने मनस्विनीला कडकडून मिठी मारली.

वयाने मोठा झालेला असला तरी अजून पूर्वीसारखा लगेच येऊन बिलगतो ते पाहून तिलाही मनापासून आनंद झाला. मग त्याला खाली झोपाळ्यावर बसवत तिने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली,

“मल्हार अरे काय हे.. असा अचानक! तेही लंडन वरुन? आणि गाढवा, काल रात्री कळवतोस येतोय म्हणून? तेही sms ने? मला तर वाटलं गम्मतच करतोयस माझी!”

“हाहा.. अगं हो हो.. किती प्रश्न विचारशील? फ्रेश तरी होऊदे मला.. आधीच पहाटे खूप मस्त पाहुणचार झालाय माझा.. ती मुलगी कोण होती आणि?”

पहाटेच्या प्रसंगाची कल्पना येऊन मनस्विनी हसून म्हणाली.. “सांगते तुला.. आणि सॉरी त्या साऱ्या प्रकारासाठी. चल, तू फ्रेश होऊन घे. मी काहीतरी खायला बनवते मस्त!”

“हो.. प्लीज.. खूप भूक लागलीये.” मल्हार तिच्यामागून आत गेला.

आपण काहीतरी मेजर घोळ घातलेलाय हे लक्षात येऊन मुक्ता सरळ रियाजाचं निमित्त करून वर पळाली. ती थेट तास-दोन तासांनीच खाली आली. तोवर या मावशी-भाच्याच्या भरपूर गप्पा आणि नाश्ता सुद्धा पार पडला होता. तिला पाहताच मनस्विनीने तिला हाक मारून बोलाऊन घेतलं.

आता ताई आपली चांगली शाळा घेणार असं मनातल्या मनात म्हणत ती डायनिंग टेबलापाशी गेली. तिची मल्हारशी ओळख करून देत मनस्विनी म्हणाली,

“हा मल्हार.. माझा भाचा! जयु ताई विषयी बोलते नं मी अधून-मधून.. तिचा मुलगा. लंडनला असतो. वाईल्डलाईफ

बायोलोजिस्ट आहेत साहेब! त्याच्या कुठल्यातरी प्रोजेक्ट निमित्ताने आलाय इथे आपल्या सह्याद्रीचा अभ्यास करायला..”

“हाय..” मल्हारने तिच्यापुढे हात केला..

जराशी गोंधळून त्याच्या हायला नमस्तेने उत्तर देऊन ती म्हणाली,

“ते.. पहाटेसाठी सॉरी..”

तिला मधेच तोडत मनस्विनी म्हणाली,

“इट्स ओक मुक्ता, तुझी चूक नाहीये. रात्री उशिरा याचा एसएमएस आला येतोय म्हणून. तुला सांगायचं राहिलं माझं.” तिला जवळ बसवून घेत ती पुढे म्हणाली,

“आणि बरका मल्हार, ही मुक्ता! माझी शिष्या कम ऍडव्हायजर कम केअरटेकर कम फ्रेंड..”

“ताई काय अगं तू.. मस्करी कर आता माझी!” मुक्ता आणि मनस्विनी दोघी ओळखीचं हसल्या.

“बरं मुक्ता, जुवेकरांचा फोन आला होता मुंबईहून. कथ्थक एलिट नावाचा प्रोग्राम अरेंज केलाय नॅशनल कल्चरल डिपार्टमेंटने.. आपल्या क्षेत्रातले सगळे दिग्गज असणार आहेत तिथे. आणि त्यांनी मला परफॉर्मेंससाठी रिक्वेस्ट केलीये.”

“ओहह वॉव ताई.. ही तर आनंदाची बातमी आहे. कधी जातेयस मग?” मुक्ता आनंदाने म्हणाली.

“मी नाही, आपण जातोय!”

“म्हणजे?”

“म्हणजे, माझ्यासोबत तूही तिथे परफॉर्म करणार आहेस! बाकीच्या जणी सुट्टीवर घरी गेल्यायत सो यावेळी ते एक्सक्यूज पण नाहीये तुझ्याकडे. तू येतेयस आणि मी तसं कळवून पण टाकलय.”

“ताई अगं पण..” मुक्ता नाराजीने म्हणाली.

“पण काय?”

“तिथे आई पण असेल!”

“हो.. असेल. त्याने काय फरक पडतो?”

“तुला माहितीये ताई सगळं.. तरी असं विचारतेयस?”

“हो माहितीये पण म्हणून तू कधी परफॉर्मच करणार नाहीस का? किती दिवस घाबरणार आहेस?”

यावर मनस्विनी आणि मल्हार दोघांकडे एकदा पाहून काही न सुचून ती तिथून निघून गेली.

मल्हार मात्र पुरता गोंधळून गेला. मुक्ताच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत तो मनस्विनीला म्हणाला,

“काही प्रॉब्लेम आहे का मावशी?”

त्यावर एक उसासा सोडून मनस्विनी म्हणाली,

“हम्म.. आहेही आणि नाहीही!”

“म्हणजे?”

“म्हणजे.. तू अरुंधती अय्यरचं नाव ऐकलंयस?”

“पद्मश्री अरुंधती अय्यर? हो ऑब्वियसली.. त्यांना कोण नाही ओळखत? International Kaththak icon.. पण त्यांचा आणि या सिचुएशनचा काय संबंध?”

“मुक्ता त्यांची मुलगी आहे, मल्हार!”

“काय?? Are you serious?”

“हो!”

“ती इथे काय करतेय मग? आय मीन, त्या अरुंधती अय्यर सगळ्या जगाला कथ्थक शिकवतात.. तिकडे लंडनमध्ये मोठी अकॅडेमी आहे त्यांची! मी गेलेलो एका प्रोग्रामला. स्वत:च्या मुलीला त्या शिकवू शकत नाहीत??”

“शकतात नं! पण मुक्ताला शिकायचं नाहीये तिथे!”

“का?”

“कारण थोडं जगावेगळं आहे.. सांगेन पुन्हा कधीतरी!” मनस्विनीचा चेहरा थोडा चिंताग्रस्त वाटत होता. वातावरण निवळावं म्हणून मल्हार म्हणाला,

“पण मावशे.. हे काय पाहतोय मी? अॅज फार अॅज आय नो, तू एक अतिशय खडूस आणि कडक शिस्तीची गुरु आहेस.. आणि ही मुक्ता चक्क तुझी फ्रेंड वगैरे?”

“हाहा गप्प बस.. तू स्टीरियोटाइप करतोयस मला.. बीइंग स्ट्रिक्ट इज ए प्रीरेक्विसाईट इन अवर फील्ड! आणि मुक्ता विषयी म्हणशील तर, ती आहेच रे तशी. ती माझी आजवरची सगळ्यात प्रिय आणि हुशार शिष्या आहे. लाघवी आहे खूप.”

“हम्म.. पाहिलंय मी पहाटे किती लाघवी आहे ते..”

“हाहा.. कळेल तुला हळूहळू..”

मनस्विनीने मेकॅनिक बोलावून, खंडू मामांना मल्हारची घाटात बंद पडलेली गाडी घेऊन यायला पाठवलं. आणि मग मनस्विनी आणि मुक्ता त्यांच्या रियाजाला लागल्या.

अभोगी कन्नडा मधल्या एका सुंदर बंदिशीतली नजाकत मनस्विनी मुक्ताला तिच्या नृत्यभिनयातून उलगडून दाखवत होती..

मुक्ता एकाग्रतेने ते समजाऊन घेत होती. त्या सुंदर नृत्याविष्कारानंतर अतिशय कुशलतेने समेवर येत मनस्विनी थांबली आणि ‘आता तू..’ असं नजरेनेच मुक्ताला खुणावत खाली बसली.

मुक्ता उठली.. त्यांची रियाजाची जागा, घराच्या मागच्या बाजूला अतिशय कल्पकतेने मनस्विनीने तयार करवून घेतली होती. दगडी चबुतरा, त्यावर लाकडी खांब आणि वर कौलांचं छत असा तो ओपन एअर वर्तुळाकार मंडप होता.. चहुबाजूंना गर्द हिरवळ.. नारळी-पोफळीच्या बागा.. पलीकडे टेकडी.. पक्ष्यांची सततची किलबिल.. आणि तिथे घुमणारा मुक्ताच्या पैंजणांचा नाद.. अतिशय मनोहारी असं ते दृश्य असायचं!

एक दीर्घ श्वास घेऊन मुक्ताने ताल धरत तिचा पदन्यास सुरू केला.. आणि नेहमीसारखी त्या रागात हरवून जात नजाकतीने तिने सम गाठली.. आजूबाजूचे पक्षीही जणू स्तब्ध होऊन तिचं ते हरवून जाणं पाहत राहिले. खूप रेअर्ली कौतुक करणाऱ्या मनस्विनीने ’वाह!’ म्हटलं.. पण मुक्ताच्या चेहऱ्यावर मात्र समाधान उतरलं नव्हतं.. आणि हे असं नेहमीच व्हायचं.. का कोणास ठाऊक तिला अपूर्णच वाटत रहायचं.. कुठलीतरी मेजर गोष्ट तिच्या नृत्यात कमी आहे असं तिला वाटायचं.. पण कुठली ते काही तिला उमगायचं

नाही. Technically ती पर्फेक्ट होती. तिच्या त्या कल्पित पूर्णत्वाचा ध्यास घेत मग ती तास अन तास रियाज करत बसायची.

थोड्या वेळाने मल्हार झोपेतून उठून बाल्कनीमध्ये आला.. त्याची नजर रियाजात मग्न मुक्तावर गेली. ती थकली होती पण रियाज काही थांबवत नव्हती. ती त्याला एकाच वेळी खूप मोहकही वाटली आणि खूप अगतिकही.. कशाचा तरी पछाडल्यासारखा ध्यास घेऊन ती रियाज करत होती. आणि ती गोष्ट काही केल्या तिला गवसत नव्हती. तो विचारात दंग होता. तेवढ्यात मनस्विनी तिथे आली. तिला पाहून तो आधी थोडा दचकला पण नंतर सावरत म्हणाला,

"अगं मला हाक मारायची नं, मी आलो असतो खाली."

"एकाही हाकेला उत्तर मिळालं नाही म्हणून आलेय वर, साहेब नक्की कशात बिझी आहेत ते पहायला!"

खाली मुक्ताच्या रियाजाकडे पाहून मनस्विनी म्हणाली.

"अगं काही नाही मगाचपासून हा आवाज झोपमोड करत होता माझी! म्हटलं काय चालुये पाहावं तरी म्हणून.."

"माझ्या घरी हा आवाज नवीन आहे तुला? मल्हार.. बेटा, मी मावशीये तुझी! जन्मलास तेव्हा तुझ्या आईच्या आधी मी तुला मांडीवर घेतलं होतं."

“हाहा.. हो माहितीये मावशीबाई.. वाकून नमस्कार!”

“यशस्वी भव! बट एनिवेज, बाकी काय म्हणतोयस? आई-बाबांना भेटून आलास की थेट इकडेचं?”

“हम्म.. विचार होता तसा. पण कशी कोणास ठावूक गाडी इकडेच वळली.”

“काय रे तू.. ताई रागावणार आता!”

“तिचा राग कसा घालवायचा ते माहितीये मला. आणि जाणारे गं मी तिकडे पण. पण आधी काम महत्वाचं!”

“अरे हो, नक्की कसलं प्रोजेक्ट आहे?”

“अगं ते थोडसं कॉम्प्लिकेटेड आहे. थोडक्यात सांगतो, सध्या योगा सारखंचं भारतीय आयुर्वेदाविषयीही पाश्चिमात्य देशात आकर्षण वाढताना दिसतय. सो आमची इंस्टीट्यूट सध्या मेडिसीनल प्लांट्सचा अभ्यास करतेय. आणि मला प्रोजेक्ट हेड केलय. या व्हिझीटमध्ये स्पेसिफिकली कोकम निवडलाय. पुढच्या पन्नास वर्षात हवामान बदलाचे त्याच्या वाढीवर आणि पॉप्युलेशनवर काय परिणाम होऊ शकतात अशा संबंधीचा प्रोजेक्ट आहे. सो भटकावं लागणारे सह्याद्रीत 1-2 महिने. वीस स्पॉट्स फायनल केलेयत आम्ही महाराष्ट्र टू केरळ.. फील्ड स्टडी.. sampling.. observation.. etc etc..”

“हात्तिच्या!! आपल्या या कोकमाचा अभ्यास करायला तू लंडनहून इथे आलायस तर!” मनस्विनीला मज्जा वाटली. “बरं चल, जेवण तयार आहे. कांताबाईंनी छान बेत केलाय आज!”

“हो चल..” असं म्हणून त्याची नजर पुन्हा खाली गेली. मुक्ताने रियाज थांबवला होता.

“येईल ती पण.. चल तू!” मनस्विनी हसून म्हणाली.

“हाहा अगं मी जस्ट पाहत होतो.. डोन्ट थिंक अदरवाईज!..

..ए पण मावशे, हिचा प्रॉब्लेम काये नक्की? साऱ्या जगाचं ओझं स्वत:वर असल्या सारखी का वागते ही?”

“ते तू तिलाच का नाही विचारत?”

“नको रे बाबा.. पुन्हा घराबाहेर काढायची मला.” आणि दोघेही मोठयाने हसले.

दुसऱ्या दिवशी मल्हार त्याच्या प्रोजेक्टसाठी वरंधा घाटात गेला. आणि दोन-तीन दिवसांनीच उगवला. इकडे तोवर मुक्ताने मुंबईला जाण्याची मनाची तयारी केली होती. त्या दृष्टीने दोघींचा रियाज पण सुरू होता. पण नाही म्हटलं तरी तिच्या आत कुठेतरी

थोडीशी भीती होतीच. पाच-सहा वर्षांपूर्वी मुक्ता घर सोडून इथे आली तेव्हा तिने मनाशी निग्रह केला होता, स्वत:वरची अरुंधती अय्यर नावाची सावली पुसून टाकून आपली अशी नवीन ओळख निर्माण करायची आणि मगच आईसमोर पायात घुंगरू बांधायचे. तिचं असं मनस्विनीकडे निघून येणं अरुंधतीसाठी अर्थातच धक्कादायक होतं. पण नेहमीच बर्फासारख्या शांत असणाऱ्या अरुंधतीने तिला निघताना केवळ एकच वाक्य म्हटलं होतं, ‘जे काही करशील ते जीव ओतून कर!’ बास. दात-ओठ खाऊन भांडणं ना तिच्या स्वभावात होतं ना मुक्ताच्या. दोघींच नातं जगावेगळं होतं. आई-मुलीचं ते कधीचं नव्हतं.. अरुंधतीने कायम मुक्ताकडे तिची उत्तराधिकारी आणि शिष्या म्हणूनच पाहिलं आणि त्यामुळेच आईची माया ती मुक्ताला कधी देऊच शकली नाही, तिच्यातली गुरु कायम त्याच्या आड येत राहिली. आणि म्हणूनच मुक्ता तिच्यापासून दूर गेली. एक नृत्य सोडलं तर बाकी कुठल्याच बाजूने ती अरुंधतीची मुलगी वाटायची नाही. अरुंधती खरंतर दाक्षिणात्य, पण मुक्ता मात्र तिच्या बाबासारखी म्हणजेच चैतन्य सारखी पुरेपूर मराठी वळणाची झाली होती. तिला लळाही चैतन्यचाच जास्त होता. आताही दर दिवाळीला ती घरी जायची ती केवळ चैतन्यसाठीच. मागच्या दिवाळीत मात्र कधी न

भांडणाऱ्या या माय-लेकींच चांगलच भांडण झालं. तेव्हापासून तर मुक्ताच मन आईच्या बाबतीत अजूनच कटू झालं होतं.

आणि आता हे असं अचानक तिला आईसमोर स्टेजवर उभं राहावं लागणार होतं. आपण इतरांच्या अपेक्षेस उतरलो नाही तर काय या भीतीने तिचं मन तिला खात होतं. आपल्याकडून थोडीजरी चूक झाली तरी आधी आपली आईच आपल्याला हसेल यावर तर तिचा गाढ विश्वास होता. या साऱ्याविषयी ती मोकळेपणाने कधी मनस्विनी समोर बोलायची नाही पण मनस्विनीला मुक्ताची ही घालमेल जाणवायची. आणि तिच्या मनातून ही भीती घालवण्यासाठीच ती तिला बरोबर घेऊन जात होती.

तिन्हीसांजेला मल्हार आला तेव्हा मुक्ता ओसरीवर कॉफी पित, कित्तीवेळ एकाच फांदीवर बसलेल्या खंड्याकडे पाहत बसली होती.

पायरीवर बसून शूज काढत तो तिला ‘हाय!’ म्हणाला.

“हाय! झाली का कोकमाची फळं मोजून?”

“हाहा.. मॅडम, फॉर यॉर काइंड इन्फॉर्मेशन कोकमाला पावसाळ्यात नाही स्प्रिंगमध्ये फळं येतात!”

“एवढं माहितीये तर, पावसाळ्यात रस्ते कोरडे नसतात स्लीपरी होतात हेही माहीत असेलच की! आजकाल लोकांना चार

दिवस बाहेर राहून आलं की आपला देश उगाच मागास वाटायला लागतो!"

"ओहह.. हाहा.. मेमरी चांगलीये तुझी!"

यावर मुक्ताने त्याच्याकडे नुसताच एक कटाक्ष टाकला आणि पुन्हा कॉफी पिऊ लागली.

"कांताबाई, आल्याचा चहा करा मस्तपैकी!" तिथूनच त्याने कांताबाईंना आवाज दिला आणि मुक्ताकडे पाहून म्हणाला, "इतक्या सुंदर मुलीला इतका तुसडेपणा शोभत नाही!"

"हा टोमणा आहे की कॉम्प्लिमेंट!"

"बोथ!" त्याने हसत उत्तर दिलं.. मुक्ताने मग किंचित हसून त्याच्याकडे पाहिलं.

"मग, कधी आहे तुमचा मुंबईचा प्रोग्राम?" त्याने पुढे विचारलं.

"पुढच्या आठवड्यात!" मुक्ताचा चेहरा पुन्हा गंभीर झाला.

"सो, तू जातेयस!"

"हम्म.. मनस्विनी ताईला दुखवायचं नाहीये मला."

यावर तो जरासा शांतचं राहिला. आणि अर्थातच मुक्ताही! ती शांतता भेदत मग एक दीर्घ श्वास घेऊन मल्हारच पुढे म्हणाला,

“नक्की कशाला घाबरतेयस तू?”

“म्हणजे?”

“म्हणजे, तू तुझ्या आईसमोर परफॉर्म करायला घाबरतेस की परफॉर्म करायलाच घाबरतेस?”

“एक मिनिट, मी यापैकी कशालाच घाबरत नाही. मला फक्त माझ्या आईला दाखऊन द्यायचय, तिच्याशिवाय पण मी शिकू शकते.. माझी ओळख फक्त ‘अरुंधती अय्यरची मुलगी’ एवढीच नाहीये. त्यापलिकडे पण मी कोणीतरी आहे.”

“मग हे तू त्यांच्याजवळ राहून पण करू शकतेस.. त्यासाठी असं दूर राहण्याची काय गरज?”

“गरज आहे! तिथे राहिले तर मी कायम तिची मुलगी म्हणूनच ओळखले जाईन. इथे येईपर्यंत मी फक्त माझं तिच्याशी होणारं comparisonच अनुभवलंय. अरुंधती अय्यरची जेस्चर्स, हर स्टाइल.. याचं सततच दडपण! मला अरुंधती अय्यर नाही बनायचं.. मुक्ताच राहायचंय. आणि इतकं सगळं करून शेवटी मला ऐकायला काय मिळतं तर, हिला काय सगळं आयतंच मिळालंय.. नो struggle अ‍ॅट ऑल! I don’t want to live in her shadow .. want to stand on my own! दॅट्स इट.”

“हम्म.. दॅट्स इंटेरेस्टिंग.. मग आता तू तुला हवं तसं जगतेयस राइट?”

“हो”

“मग आनंदी का नाहीयेस तू? कसलं तरी दडपण तू आत्ताही घेतलेलच आहेस.. म्हणजे तसं वाटतं तरी!”

यावर मुक्ता क्षणभर शांतच राहिली. कोणीतरी आपल्या मनातला गोंधळ शब्दात मांडतय असं तिला वाटलं पण तिने ते मान्य केलं नाही! ती म्हणाली,

“तुला कोणी सांगितलं मी आनंदात नाहीये! आहे मी. चार दिवसाच्या ओळखीत तू या निकषावर येऊ नकोस. Don’t be so judgemental!”

“no no.. not at all.. मी फक्त मला जे जाणवलं ते सांगतोय! Just think over it!”

असं म्हणून मल्हार आत निघून गेला. पण मुक्ता मात्र विचारात पडली.

ठरल्याप्रमाणे कार्यक्रमाच्या एक दिवस आधी दोघी मुंबईत आल्या. सगळी तयारी झालेली होती. आता फक्त कार्यक्रमालाच उशीर होता. मनस्विनी नेहमीप्रमाणेच स्थितप्रज्ञ भासत होती पण

मुक्ताच्या मनात मात्र प्रचंड गोंधळ सुरू होता. तिला तिचं आणि अरुंधतीचं शेवटचं भांडण आठवलं..

ती परत निघायच्या आदल्या दिवशी अरुंधती तिला म्हणाली,

"मुक्ता, इतकी वर्षं मी काही म्हणाले नाही, पण मला वाटतं आता तू परत यायला हवस. काही महिन्यात अलंकार पण होशील तू सो शिक्षण पूर्ण झालंच आहे आता तुझं. तुला माझ्याकडे शिकायचं नव्हतं फाइन. मी समजून घेतलं. पण आता तुझं हे खूळ पुरे. कम बॅक! हा सगळा पसारा पुढे तुलाच सांभाळायचा आहे. I just need to train you a little for that."

"खूळ? माझं इथून निघून जाणं हे खूळ नाहीये आई! It is a serious business for me. स्वत: सोडून इतरांच्या मतांनाही इम्पॉर्टेन्स देत जा तू कधी कधी!"

"इथला सगळा सेट अप सोडून तिथे दूर कोकणात जाऊन राहण्यात कसला आलाय सिरियस बिजनेस?? मुक्ता कळत का नाहीये तुला, हे सगळं दुसऱ्या कोणाला इतकं इजिली मिळत नाही. यू आर लकी टू हॅव ऑल धिस रेडीमेड! कम बॅक बेटा!"

"आई.. अगं तेच तर नकोय मला! तुला का कळत नाहीये? मी अरुंधती अय्यरचं साम्राज्य सांभाळण्यासाठी जन्माला नाही आलेय! I am Mukta Chaitanya! And I want to be

Mukta Chaitanya only!! I'm not your puppet or pawn mumma.. I have my own dreams! तू आखून दिलेलं आयुष्य नाही जगायचं मला. तुला वाटतं, मी श्वास सुद्धा तुझ्या सारखाच घ्यावा.. पण ते शक्य नाहीये. मी नाही रमत तुझ्या क्लासिकल स्टाइल मध्ये.. गोष्टी इम्प्रोवाइज करायला आवडतात मला. And I know you won't understand it ever!"

"oh is it? हे तू तुझ्या आईला सांगतेयस?"

"आई?? तू माझी 'आई' कधीच नव्हतीस मम्मा! तू कायम 'अरुंधती अय्यर' बनुनच वागत आणि बोलत आलीयेस माझ्याशी."

"मुक्ता.. हे सगळं बोलणं खूप सोपं आहे. Try to be in my place for a while. I want you to be successful beta. तू अरुंधती अय्यरची मुलगी आहेस! आणि तशी शोभायलाही हवीस."

"तेच तर.. कधीतरी मुक्ता म्हणूनही बघ माझ्याकडे! सतत comparison! मी कंटाळलेय या सगळ्याला."

"तुला गोष्टी इतक्या सोप्या वाटतात मुक्ता! ठिके मग.. जा!! बाहेरच्या जगाच्या झळा बसल्या की समजेल सगळं. Go and

prove yourself! ‘मुक्ता चैतन्य’ म्हणून तुझी identity सिद्ध करून दाखव आणि मगच ये माझ्यासमोर!”

मुक्ताने तिच्याकडे रोखून पाहिलं आणि “sure!” इतकंच म्हणून ती दुसऱ्या दिवशी मनस्विनीकडे परत आली.

त्या दिवसानंतर आजच तिचा अरुंधतीशी सामना होणार होता. मुक्ताने कितीही बळ एकवटलेलं असलं तरी आतून तिला काहीतरी कमतरता जाणवतच होतं. रियाज करताना जाणवायची तशी! सगळे मान्यवर सभागृहात जमा झाले होते. कार्यक्रमाची सुरुवातच मनस्विनी आणि मुक्ताच्या नृत्याने होणार होती. सगळ्या पूर्वसूचना झाल्या होत्या. मनस्विनी आणि मुक्ता स्टेजवर स्थिर मुद्रेत उभ्या होत्या. सभागृहातले lights ऑफ झाले. मुक्ताची धडधड अजूनच वाढली. समोरच्या बंद पडद्याच्या फटीतून तिला पाहिल्याच रांगेत बसलेली अरुंधती दिसली. तिच्या वयापेक्षा दहा वर्षांनी लहान वाटणारी अरुंधती, नाकी-डोळी नीटस, रेखीव आणि तेजाने पुरेपूर दिसायची. मुक्ताला प्रश्न पडायचा, आपली आई नेहमीच इतकी आकर्षक कशी दिसु शकते! हळूहळू पडदा वर सरकू लागला.. आणि अभोगी कन्नडा मधली सुरावट सभागृहात घुमू लागली..

मल्हारचे एव्हाना दोन-तीन स्पॉट्स अभ्यासून झाले होते. तो घरीच बसून मिळालेला डाटा प्रोसेस करत होता. मनस्विनी आणि मुक्ता नसल्यामुळे त्याला खरंतर थोडंसं बोअरच होत होतं. सतत रियाजात मग्न मुक्ताला आणि तिच्या तिरकस बोलण्याला तो मिस करत होता. खरंतर मल्हार त्याच्या कामाच्या बाबतीत प्रचंड passionate होता. लहानपणापासूनच झाडं-प्राणी-पक्षी यांच्यामध्ये रमायचा. मोठं झाल्यावर मग रुळलेल्या वाटा न निवडता त्याने त्याच्या या आवडीलाच त्याचं करियर म्हणून निवडलं आणि थेट नावाजलेल्या लंडन वाइल्डलाइफ इंस्टीट्यूट पर्यन्त जाऊन पोचला. त्याचं काम तिथे वाखाणलं जात होतं. धाडस, झोकून देण्याची वृत्ती, सतत नाविन्याचा ध्यास, प्रवास, जग पाहण्याची तीव्र इच्छा.. या सगळयामुळे तो इतरांपेक्षा वेगळा ठरायचा. एका ठिकाणी सेटल वगैरे होऊन स्वप्नपूर्तीसाठी रिटायरमेंटची वाट पाहणाऱ्यांपैकी तो नव्हता. बेभान होऊन मन मानेल तिकडे वाऱ्यासारखं वाहण्यात त्याला थ्रिल वाटायचं. एका ठिकाणी फारसा तो कधी रमायचाच नाही. इथेही खरंतर सुरूवातीचे 1-2 आठवडे मनस्विनीकडे राहून नंतर बेस गोव्यात मित्राकडे

हलवून पुढचं काम करण्याचा त्याचा विचार होता. पण त्या पहाटे पारिजातकाच्या सड्यामध्ये उभ्या मुक्ताला पाहिल्यानंतर कसा कोण जाणे त्याचा प्लान बदलला आणि पूर्णवेळ इथेच मुक्काम ठेऊन बाकी फील्ड स्टडीसाठी येत जात राहायचं असं त्याने ठरवलं.

पडदा पूर्ण वर सरकला. सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. मनस्विनीने नेहमीप्रमाणे एक-दोन मिनिटातच प्रेक्षकांच्या मनाचा ताबा घेतला. अभोगी मधली ती चीज तिच्या एकेका मुद्रेतून, विभ्रमातून, पदलालित्यातून जणू जिवंत होत होती. हळूहळू सुर, ताल आणि ती अभिन्न होत गेले आणि सभागृह मंत्रमुग्ध झालं. मुक्ता तिला साथ देत होती म्हणजे तसा प्रयत्न करत होती. पण तिच्या देहबोलीत आज काहीतरी न्यून होतं. तिची पावलं तालात जरूर थिरकत होती, ती चीजही तिच्यात तितकीच झिरपलेली होती.. तरीपण.. 'आपलं काही चुकणार तर नाही?' हा विचार तिच्या मनात सतत चालू होता आणि तोच तिच्या नृत्यावर परिणामही करत होता. शेवटाकडे येता येता एक दीर्घ चक्र दोघींनी घेतलं आणि ते घेता घेता मुक्ताची नजर अरुंधतीकडे गेली. अरुंधती

तिच्याकडे रोखून पाहत होती. तिच्या त्या नजरेत का कोणास ठाऊक मुक्ताला स्वत:ची हार दिसू लागली. आणि त्या विचलित अवस्थेत शेवटची तिची सम क्षणभराच्या फरकाने हुकली.. मनस्विनीच्या ते लक्षात आलं, तिने अत्यंत चपळाईने मुक्ताची बाजू सांभाळून घेत आणखी एक तीव्र चक्र घेऊन त्या नृत्याविष्काराचा शेवट केला. इतर कोणाच्या लक्षात आलं नसलं तरी अरुंधतीच्या नजरेतून मात्र हे सुटलं नाही. पूर्ण सभागृहात टाळयांचा पाऊस पडला. अरुंधती मात्र तिच्या त्याच भेदक नजरेने मुक्ताकडे पहात राहिली. .

यथावकाश कार्यक्रम पार पडला. नंतरच्या डिनरसाठी सगळे जमलेले असताना मुक्ता एकटीचं कोपऱ्यातल्या टेबलाशी पाण्याचा ग्लास हातात घेऊन सुन्न बसून होती. मनस्विनी भोवती सगळयांचा गराडा होता. बऱ्याच दिवसांनी भेटी होत असल्याने ती गप्पा-गोष्टीत दंग होती.

एकटक हातातल्या अर्ध्या रिकाम्या ग्लासकडे पहात असताना, मुक्ताच्या कानांवर ओळखीचा आवाज आला,

“सो.. धीस इज इट?”

मुक्ताने वळून पाहिलं, तिच्यामागे विजयी मुद्रेने तिच्याकडे पहात अरुंधती उभी होती.

“काय?” तिच्या बोलण्याचा रोख न कळून मुक्ता म्हणाली.

“म्हणजे यासाठी मला सोडून आलीस तू?”

“नक्की काय म्हणायचंय आई तुला?” मुक्ताने विचारलं.

“मला हेच म्हणायचंय ‘मुक्ता चैतन्य’, की तुमच्यात मला शून्य प्रगती दिसतेय! माझ्याकडे होतीस तेव्हाही अशीचं होतीस.. लो कॉन्फिडन्स.. नो शार्प मुव्हमेन्ट्स.. लॉस्ट माइंड.. अँड ग्रेसलेस डान्स!! ज्या आवेगाने तू निघून आलीस, आय वॉज इक्सपेक्टींग सम सरप्रायजेस! बट यू डिसअप्पोइंटेड मी.. अगेन!”

मुक्ताचं मन आधीच तिला खात होतं त्यात अरुंधतीच्या या अशा बोलण्याने तिला अजून थिजल्या सारखं वाटू लागलं.. ती तशीच मान खाली घालून उभी होती, कुठल्याही क्षणी रडू कोसळेल अशा अवस्थेत!

तितक्यात परिस्थितीचा अंदाज घेऊन मनस्विनी तिथे आली आणि मुक्ताला एका हाताने स्वत:जवळ घेत ती म्हणाली,

“मुक्ता यू वर अमेझिंग टुडे! द वे यू हॅंडल्ड युअरसेल्फ दॅट वॉज व्हेरी ब्रेव्ह बेटा..!”

भरल्या डोळ्यांनी मनस्विनीकडे पहात तिने हसण्याचा व्यर्थ प्रयत्न केला.

“नाऊ आय अंडरस्टॅंड.. गुरुनेच असं डोक्यावर चढवून ठेवलंय म्हटल्यावर साहजिक आहे शिष्यांकडून अशा चुका होणं!” अरुंधती म्हणाली.

तिच्याकडे रोखून बघत मनस्विनी किंचित हसली आणि मग तिच्या नजरेत नजर मिळवून म्हणाली,

“वर्ष १९८५, स्थळ सेंट्रल हॉल, पुणे.. ललित कला केंद्राचा कार्यक्रम.. स्टेजवर पद्मिनी ताईंबरोबर तरुण अरुंधती आणि त्यांची आणखी एक शिष्या.. दोघींचा पहिलाचं मोठा परफॉर्मेंस.. पहिला तीन ताल झाल्यावर दुसऱ्या आवर्तनाच्या वेळी अरुंधती चक्क मिनीटभर ब्लॅंक झाली! तिला काही सुचेचना. एकदम घामेघूम! पण पद्मिनीताईंनी हुशारीने त्या ब्लॅंक होण्याला अभिनयाचाच भाग बनवलं आणि तिला पुन्हा नृत्यात सामावून घेतलं!.... आठवतंय ‘अरुंधती जी’?”

अरुंधती क्षणभर तिच्याकडे पाहतच राहिली. आणि मग सावरुन म्हणाली,

“स्मरणशक्ती उत्तम आहे अजून तुझी, मनस्विनी!”

“हो अर्थात! तुला सगळ्याचा विसर पडला म्हणून काय झालं.”

“सगळं लक्षात आहे माझ्या! पण मुक्ताची माझ्या सोबत तुलना करु नकोस तू!”

“का? त्रास झाला? आणि तसंही मी मुक्ताची तुझ्याशी तुलना कधीच करणार नाही! मी फक्त पहिल्यांदा मोठ्या कार्यक्रमात परफ़ॉर्म करणाऱ्या दोन नवोदित नर्तिकांची तुलना केली.. तेव्हा ती तू होतीस आणि आता मुक्ता आहे बास!”

मुक्ता या दोघींचा हा असा संवाद पाहून अवाक् झाली. एका क्षेत्रातल्या असल्यामुळे त्या दोघी एकमेकींना ओळखत असणार इतपतच तिची समज होती. पण हे असं एकमेकींशी एकेरी बोलणं, जुनी गाढ ओळख असल्यासारखं वागणं तिच्यासाठी जरासं नवीनच होतं. न राहवून ती म्हणाली,

“तुम्ही दोघी ओळखता एकमेकींना पूर्वीपासून?”

तिच्या या प्रश्नानंतर मनस्विनीकडे एक करकरीत कटाक्ष टाकून अरुंधती तिथून निघून गेली. पण यावेळी मात्र तिच्या नजरेत पराभव होता, तिचा स्वत:चा!

तिच्या अशा निघून जाण्याने मुक्ता मात्र विचारात पडली आणि प्रश्नार्थक नजरेने तिने मनस्विनीकडे पाहिलं. तिचा गोंधळ उमगुन मनस्विनी तिला म्हणाली,

“त्या कार्यक्रमातली पद्मिनी ताईंची ती दुसरी शिष्या मी होते!”

आता मुक्ता चांगलीच आश्चर्यचकित झाली.

“म्हणजे, तुम्ही दोघी गुरु-भगिनी आहात? इतकी जुनी ओळख आहे तुमची एकमेकींशी? मला कधीच काहीच का नाही बोललात तुम्ही?”

“त्याने काही फरक पडला असता का?”

“नाही तसं नाही.. पण..”

“झालं तर मग.. चल निघुया?”

“हो..”

मुक्ता सावरुन म्हणाली आणि मग दोघी तिथून बाहेर पडल्या.

परत आल्यावर मुक्ताचं लक्ष कशातच लागेना. सतत डोळ्यांसमोर अरुंधतीचे शब्द उमटू लागले. सहा वर्षे अहोरात्र मेहनत करुन जर स्टेजवर आपलं ततपप होणार असेल तर खरंच काय अर्थ आहे या मेहनतीला? ज्या जिद्दीने आपण घराबाहेर पडलो ती जिद्द इतकी विफल ठरावी? आपण नक्की काय साध्य केलं? यासारखे कितीतरी प्रश्न सतत तिच्या मनात पिंगा घालू लागले. अरुंधती कितीही कठोर, निर्दयी वाटत असली तरी ती म्हणतेय ते खरंच तर आहे की असंही तिला वाटून गेलं. इतके मोठे दावे करुन शेवटी आपण एक अतिसामान्य परफॉर्मेंस देऊन परत

आलो याचं वैषम्य तिच्या मनात खोल रुतलं होतं. ती रियाज करेनाशी झाली. कुठल्यातरी पुस्तकात तोंड खुपसून तास अन् तास विचार करत बसू लागली. आपल्या जिवीताचं कारणच कोणीतरी आपल्यापासून हिरावून घ्यावं अशी तिची अवस्था झाली. मनस्विनीला तिच्याकडे पहावेना. तिने तिला समजावून पाहिलं, प्रोत्साहित करुन पाहिलं, प्रसंगी रागावूनही पाहिलं पण या कशाचाच म्हणावा तसा परिणाम मुक्तावर होत नव्हता. ती अजून अजून गप्प गप्प होत गेली..

मुक्ताची ती अवस्था पाहून मनस्विनी आता चांगलीच चिंतेत पडली. देश पातळीवर मानाची समजली जाणारी अभिजात कथ्थक स्पर्धा अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली होती. ती जिंकणं हे मुक्ताचं ध्येय होतं. देशभरातले अव्वल स्पर्धक त्यात दरवर्षी भाग घेतात. अतिशय कठीण समजली जाणारी ही स्पर्धा उदयोन्मुख कलाकारांसाठी स्वत:ला सिद्ध करण्याचं एक दर्जेदार साधन होतं. आणि गमतीची गोष्ट ही की, गेल्या वर्षीचा अपवाद सोडला तर त्या आधीची सलग दहा वर्ष स्पर्धा मनस्विनीच्या शिष्यांनीच जिंकली होती. मनस्विनीचा हा लौकिक आणि तिचं प्रवाहाविरुद्ध जाऊन स्वत:चं असं अढळ स्थान निर्माण करणं यामुळेच तर मुक्ताने सहा वर्षांपूर्वी अरुंधतीच्या नकळत मनस्विनीच्या ‘लास्या’ कथ्थक अकादमीची प्रवेश परीक्षा दिली

आणि सिलेक्ट झाल्यावर तडक बॅग भरून इथे येऊन शिकायला दाखल झाली. तिचं नाव फॉर्मवर पाहून मनस्विनीलाही आधी आश्चर्यचं वाटलं होतं.. तिनेही मग एक काकण जास्तच कठीण परीक्षा घेतली मुक्ताची पण मुक्ता त्यात उत्तीर्ण तर झालीच वर तिच्या त्या बेधडक अंदाजाने तिने मनस्विनीला मोहितही केलं होतं. पण तेव्हाची ती ध्येयाने पछाडलेली मुक्ता मागच्या एक-दोन वर्षात मात्र कुठेतरी हरवल्या सारखी वाटत होती. काहीच अभ्यास न करता आधीच्या तोडक्या ज्ञांनाच्या आधारावर जे होईल ते पाहू असं म्हणून दिलेली परीक्षा आणि खूप, अगदी रात्रंदिवस अभ्यास करून, सतत परीक्षेचाच विचार डोक्यात ठेऊन, भरपूर ज्ञान साठवून शेवटच्या क्षणी नर्वस होऊन दिलेली परीक्षा असा काहीसा फरक मुक्ताच्या तेव्हाच्या आणि आत्ताच्या वागण्यात दिसत होता.

घरातलं हे असं टेन्स वातावरण मल्हारच्या नजरेतूनही सुटलं नव्हतं. मुंबईहून आल्यापासून दोघी अगदीच शांत शांत होत्या. मुक्ताची अवस्था पाहून तिला डिरेक्टली त्याने काही विचारलं नाही. पण, त्या दिवशी सावंतवाडीहून परतल्यावर रात्री मनस्विनीचा काळजीने भरलेला चेहरा पाहून त्याने तिला न राहवून विचारलं,

“मनू मावशी, नक्की काय झालंय? तुम्ही मुंबईहून परतल्यापासून पाहतोय मी, दोघीही लॉस्ट आहात. काही घडलंय का तिथे?”

मनस्विनीने त्याच्याकडे पाहिलं आणि म्हणाली,

“मुक्ताला कॉन्फिडंस यावा म्हणून घेऊन गेले रे मी तिला हट्टाने माझ्यासोबत. पण घडलं उलटच! तिचं हे असं स्वत:ला मिटून घेणं खूप छळतय मला. माझी एक गुणी शिष्या माझ्या डोळ्यांदेखत हरत जाताना पाहतेय मी. आणि मला कळत नाहीये, काय केलं म्हणजे मला ती पूर्वीची मुक्ता परत मिळेल!”

“अगं हो.. पण झालंय काय नक्की?”

“तिचा तिथला परफॉर्मेंस म्हणावा तसा झाला नाही. घाबरली, गोंधळली, चुकली. आणि हे सगळं अरुंधतीच्या समोर झालं, त्यामुळे ते तिच्या अजूनच जिव्हारी लागलंय. खरंतर पहिल्या वेळी हे असं होणं अगदी स्वाभाविक आहे रे पण ही पोर मानायलाच तयार नाही. गेली सहा वर्षं पछाडल्यासारखा रियाज आणि अभ्यास केलाय पोरीने. पण या माय-लेकींचा काय वाद झालाय काय माहीत मागच्या दिवाळीत. तेव्हापासून बिथरलीये नुसती.”

“ओहह..” मल्हार विचारात पडला.

"आधी वेड्यासारखा रियाज करायची. थोडी विश्रांती घे म्हणावं लागायचं मला. आणि आता सगळंच सोडून दिल्यासारखी वागतेय. दोन महिन्यांवर नॅशनल कोंपिटिशन आलीये आणि हिची ही अवस्था. यावर्षी पहिल्यांदा भाग घेणार होती. जिंकून अरुंधतीला दाखवून द्यायचं होतं तिला की ती सुद्धा काहीतरइ करू शकते तेही स्वत:च्या बळावर! पण आता.."

"पण त्या अरुंधती अय्यरचं आणि हिचं इतकं का वाकडं आहे गं? म्हणजे कुठली आई आपल्या मुलीशी इतकं कठोर वागते!" मल्हार विस्मयाने म्हणाला.

यावर एक मोठा सुस्कारा सोडून मनस्विनी म्हणाली,

"माणूस एका ठराविक उंचीवर पोचला ना मल्हार, की तो त्या उंचीच्या ओझ्याखाली दबायला लागतो. स्वत:ची 'इमेज' जपण्याच्या नादात खुद्द स्वत:लाच हरवून बसतो. आपलीच सावली आपल्यापेक्षा मोठी होत जाते मग. अरुंधतीचंही असंच काहीतरी झालंय. आणि या साऱ्याची शिकार मात्र झालीये मुक्ता. तिचं लहानपण घुंगरांच्या नादामध्ये हरवून गेलंय. सतत अरुंधतीच्या अपेक्षांना खरं उतरण्याची धडपड! कोमेजून गेलीये बिचारी. अरुंधतीही तशी वाईट नाही रे.. पण आधीच तिचा स्वभाव महत्वाकांक्षी, त्यात तिला भरघोस यश मिळत गेलं आणि ती

त्याच्या आधीन झाली. स्वत:च्या मुलीचं असं स्वत:ला सोडून जाणं आणि कुठे तर तेही माझ्याकडे? हे सगळं तिच्याही जिव्हारी लागलं असणार! इगो दुखावला असणार! सो या सगळयाचं फलित आहे माय-लेकींमधलं हे शीत-युद्ध! पण या सगळयात मुक्ताचं करियर विस्कटू नये इतकच वाटतंय.”

“हम्म.. मी बोलून बघू का तिच्याशी..” मल्हारने विचारलं.

“बघ.. तुम्ही एका वयाचे आहात. ऐकलं तुझं तिने तर चांगलंच आहे.”

सकाळी मल्हार जरासा उशीराच उठला. बाल्कनीतुन त्याला मुक्ता दिसली. घुंगरू बाजूला पडलेले होते आणि ती कठड्यावर बसून पक्षांना दाणे टाकत होती. तो आवरून खाली आला, मस्त कॉफी बनवली आणि दोन मगांमध्ये ओतून मुक्ता बसली होती तिथे आला.

“कॉफी?” मग तिच्यापुढे धरत त्याने विचारलं.

मुक्ताने आधी कॉफीकडे पाहिलं आणि मग मान वर करून मल्हारकडे. पण काहीच बोलली नाही. मल्हार पुढे म्हणाला,

“अगं, घे घे.. चांगली कॉफी बनवतो मी. माझी शेवटची गर्लफ्रेंड माझ्या कॉफीमुळेच माझ्या प्रेमात पडली होती.”

यावर जरासं चकित होऊन तिने तो मग हातात घेतला आणि त्याला बसायला थोडी जागा करून म्हणाली,

“शेवटची म्हणजे नक्की किती होत्या?”

त्यावर मोठयाने हसून तो म्हणाला,

“मुलींच वय आणि मुलांच्या गर्लफ्रेंड्स यांचा काऊंट विचारायचा नसतो असं म्हणतात!”

त्यावर किंचित हसून मुक्ता म्हणाली,

“अच्छा हो का.. कोण म्हणतं असं?”

“आहेत एक थोर विचारवंत, जग त्यांना मल्हार साठे या नावाने ओळखतं!”

“हाहा विचारवंत.. बसा खाली.” मुक्ता खळखळून हसली.

तिच्या त्या हसण्याकडे पहात मल्हार तिला म्हणाला,

“तुला या आधी कोणी सांगितलंय का?”

त्याला मध्येच तोडत मुक्ता हसून त्याला म्हणाली, “की मी खूप छान हसते वगैरे? हाहा डोन्ट ट्राय.. मी काही ही कॉफी पिऊन तुझ्या प्रेमात वगैरे पडणार नाहीये!”

“ओहह शिट.. कित्ती कष्टाने कॉफी बनवली होती मी.. ऑल वेंट इन वेन!” आणि मग यावर दोघेही हसले.

“हसत जा गं.. चांगलं असतं तब्येतीसाठी! लाइफ इज प्रेशस, डोन्ट वेस्ट इट ओवरथिंकिंग ऑर वर्यींग अबाऊट द थिंग्ज यू कॅन नॉट कंट्रोल!” मल्हार मुक्ताकडे पहात म्हणाला.

त्यावर जराशी सीरियस होत, मुक्ता म्हणाली.. “यू डोन्ट नो एनिथिंग अबाऊट मी मल्हार!”

“आय नो ‘यू’! एव्रिथिंग एल्स डझंट मॅटर!”

मुक्ताने क्षणभर त्याच्याकडे वळून पाहिलं, तो जे म्हणत होता ते तिच्यासाठी नवीन होतं..

“हे असं फक्त ‘मला’ ओळखण पुरेसं आहे? विदाउट नोइंग माय बॅकग्राऊंड, माय अपब्रिंगिंग अँड ऑल दॅट स्टफ??”

“हो.. नक्कीच! माझ्यासाठी तरी आहे.”

मुक्ताला त्याच्या नजरेत एक वेगळीच आश्वस्त ओळख दिसली. तो पुढे म्हणाला,

“आणि एक सांगू मुक्ता? तुझ्यासाठीही तेवढंच पुरेसं असायला हवं! हे असं सतत भूतकाळाचं ओझं वाहनं सोडून दे. तू इतरांकडून किंवा तुझ्या आईकडून जी अपेक्षा करतेयस ना, की मला ‘मी’ राहुद्या वगैरे.. त्याची सुरुवात आधी तू तुझ्यापासून कर. तू आधी ‘मुक्ता’ हो मगच जग तुला मुक्ता म्हणेल!”

“म्हणजे नक्की काय करू?”

“म्हणजे, तुझं ध्येय, तुझी स्वप्नं, तुझे रस्ते ‘तू’ ठरव! नुसतं आईला सोडून इथे येऊन राहणं पुरेसं नाहीये. इथे येऊनही तू ‘तुझ्या आईला’ तू कशी बनलेली आवडशील किंवा कशाने ‘लोक’ तुला तुझ्या नावाने ओळखतील किंवा तू काय करू शकतेस हे ‘आईला’ दाखवून देण्यासाठी वगैरे म्हणून रियाज करतेयस.. तुझे सगळे प्रयत्न ‘लोकांच्या’ अपेक्षांना खरं उतरण्यासाठी चालूयेत, कोणालातरी काहीतरी दाखवून देण्यासाठी चालूयेत! डोन्ट डू दॅट.. तू कधी स्वत:ला विचारलंयस की ‘तुला’ नक्की काय हवय? ते एकदा करून बघ.. उत्तर तुझं तुला मिळेल! अँड बिलिव्ह मी, आपण जेव्हा गोष्टी स्वत:साठी, स्वत:च्या आनंदासाठी, स्वत:च्या नजरेत काहीतरी बनण्यासाठी करतो ना तेव्हाच त्या बेस्ट रिजल्ट देतात! आणि त्या पॉइंटला एकदा आपण पोचलो की मग आत्ता तू ज्याच्यासाठी झुरतेयस त्या इतरांच्या व्हालीडेशनची गरजचं भासत नाही..”

मल्हारचं बोलणं मुक्ताच्या मनाला भिडत होतं.. एक कुठलीतरी नवीन आणि सुंदर वाट आपल्यासाठी मोकळी होतेय असं तिला वाटलं.. समाधानाचं हसू तिच्या चेहऱ्यावर उमटलं.

“थँक यू..” ती म्हणाली.

“मोस्ट वेलकम!! हे असं ज्ञान मी अधून-मधून देत असतो!” वातावरण जरासं हलक करत तो म्हणाला.

“मी कॉफीसाठी म्हणतेय!” त्याच्या प्रयत्नांना हातभार लावत तिने डोळे मिचकावले.

“हाहा.. ओहह दॅट्स माय प्लेजर! मी म्हटलं होतं ना, माझ्या हातची कॉफी पिणाऱ्या मुली माझ्या प्रेमातचं पडतात”

“हम्म.. मिस्टर. ओवरकोंफिडेंट! तोंड पाहिलंय का आरशात?” मुक्ता हसून म्हणाली आणि आत जायला निघाली.

तिच्यामागून आत जात मल्हार म्हणाला,

“वेल.. हा निरागस चेहरा हॅंडसम आहे असं म्हणतोय आरसा..”

“हाहा.. निरागस!!..”

त्या दिवसानंतर त्या दोघातलं नातं जसं खुलत गेलं तसच मुक्तालाही तिचा हरवलेला सूर नव्याने गवसायला लागला. पण गोष्टी अर्थातच सोप्या नव्हत्या. सगळ्या गोष्टींची नव्याने सुरुवात करावी लागणार होती. स्वत:कडे स्वत:च्या नजरेतून पाहता येणं ही सोपी गोष्ट खचितच नाही. पण तसा प्रयत्न करायचाय हे आता तिचं ठरलं होतं आणि तो करायला तिने सुरुवातही केली होती. ती पुन्हा

पुस्तकं वाचायला लागली.. कविता लिहायला लागली, अगदी कित्तीतरी वर्षांनी.. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे, पुन्हा रियाज करायला लागली! कथ्थक मधला ‘कवित’ हा प्रकार मुक्ताला नेहमीच खूप जवळचा वाटायचा.. त्यात नृत्यातल्या इतर गोष्टीपेक्षा नृत्याभिनयातून काव्यार्थ प्रभावीपणे पोचवणं याला जास्त महत्व असतं.. या प्रकारात मुक्ता प्रो होती. अरुंधतीच्या धाकामुळे मात्र तिने त्याला तितकं जवळ येऊ दिलं नव्हतं. पण आता त्याचा परत विचार करायला हवा असं तिला वाटू लागलं. आणि ती त्या दृष्टीने रियाजही करू लागली होती॰ तिच्यातले हे बदल पाहून मनस्विनीला मनापासून आनंद झाला. तिने त्यासाठी मल्हारचे खूप आभारही मानले.

त्या हंगामातली ताजी आंब्याची पोळी त्याला खायला देत ती म्हणाली,

“काय जादू केलीस रे तू?”

“मी काही जादूगार नाहीये मावशी. फक्त तिला आरसा दाखवला मी. जादू तिची तीच घडवेल बघ आता.” मल्हार शांतपणे म्हणाला.

“मल्हार, तुला एक विचारू? खरं उत्तर देशील?”

“चक्क परवानगी? विचार की. मी नेहमी खरच बोलतो.”

जराशा सिरियस आविर्भावात मनस्विनीने त्याला विचारलं,

“तू प्रेमात पडलायस मुक्ताच्या? किंवा ती तुझ्या?”

हातातली आंब्याची पोळी बाजूला ठेवत त्याने तिच्याकडे पाहिलं आणि शांतपणे म्हणाला,

“वेल.. खरं सांगायचं तर हो! पण हे नक्की प्रेमच आहे की आणखी काही ते फिगर आऊट व्हायचय अजून. आणि तिच्याविषयी विचारशील तर ते मला माहीत नाही”

अपेक्षित उत्तराने मनस्विनी विचारात पडली. आणि जरावेळाने म्हणाली,

“मल्हार, सी, मी याच्या विरोधात नाहीये. पण लंडनमध्ये राहिलेली असली तरी मुक्ता वेगळी मुलगी आहे. आणि तू हा असा भटक्या! सो, खऱ्या अर्थाने ‘सिरियस’ असशील तरच पुढे जा. ती तुझ्या ढीगभर गर्लफ्रेंड्स पैकी एक कधीही होणार नाही.”

मनस्विनीच्या बोलण्याचा रोख उमगून मल्हार म्हणाला,

“मावशी.. ती वेगळीये हे तर मला पहिल्या भेटीतचं समजलं होतं. आणि डोन्ट वरी मीही तिच्याकडे गर्लफ्रेंड म्हणून पाहत नाही/पाहणार नाही! काय माहित या भटक्याला ठेहराव देईल ती.. किंवा हू नोज, कदाचित काही घडणार पण नाही आमच्यात! सो, ॲज फॉर नाऊ, डोन्ट जंप ऑन एनी conclusion!”

"या या, ऑफकोर्स!" मनस्विनी शांतपणे म्हणाली.

"ॲलिस, पोस्टपोन ऑल माय टूडेज अपॉईंटमेंट्स.. आय ॲम नॉट कमिंग टूडे!"

सेक्रेटरीला सूचना देऊन अरुंधतीने फोन ठेवला. मुंबईहून परत आल्यापासून तीही थोडी डाउनच होती. चैतन्यच्या अर्थातच ते लक्षात आलं होतं. तिकडे मुक्ताही त्याचे कॉल्स घेईनाशी झाली होती. त्यामुळे तो चांगलाच चिंतेत होता. आणि आज हे असं कामाच्या बाबतीत अति सिरियस असणाऱ्या अरुंधतीला कधी नव्हे ते सगळ्या अपॉईंटमेंट्स कॅन्सल करताना पाहून तो जरासा चकितच झाला. त्याने विचारलं,

"सगळं ठीक आहे नं, अरुंधती?"

"हो एकदम.. असं का विचारतोयस?" नेहमीसारखा चेहरा कोरा ठेवत अरुंधती उत्तरली॰

"तसं वाटत नाहीये म्हणून विचारतोय."

"हो का? काय वाटतय मग"

"हेच की तिकडे मुंबईला काहीतरी घडलंय पण तू मला सांगत नाहीयेस!"

यावर एक मोठा सुस्कारा सोडून अरुंधती म्हणाली,

“काय ऐकायचय तुला? तुझ्या मुक्ताचा परफॉर्मेंस कसा झाला हेच ना?”

“‘आपली मुक्ता’ अरुंधती!”

“हाहा.. ती माझ्यापासून केव्हाच दूर गेलीये चैतन्य! एनीवेज ऐक, तिच्या गुरूचा परफॉर्मेंस ऑब्वियसली खूप सुंदर झाला, पूर्वीसारखाच! पण मुक्ता मात्र खूपच अॅवरेज होती.. फार बिलो एक्सपेक्टेशन्स! ‘यासाठी मला सोडून गेलीस का’ असं विचारलंही मी तिला. रडत बसली मग मुळूमुळू!”

“ओह अरुंधती!! तुला काहीच वाटत नाही इतकं हार्टलेस वागताना?? तिचा पहिला मोठा कार्यक्रम होता तो.. धिस इज ओब्विऔस!.. ती खचली असणार आता चांगलीच.. तरीच माझे कॉल्स घेत नाहीये! दोन महिन्यांवर कॉम्पटिशन आलीये तिची..” तो उठला आणि गडबडीने जायला निघाला..

“विसर ती कॉम्पटिशन.. प्रेलिमिनेरी राऊंड मधेच आऊट होईल बघ ती. पाहून आलेय मी तिचा परफॉर्मेंस! कुठे निघालास तू?”

“उद्याची पहिली फ्लाइट बूक करायला.. आय नीड टू सी हर!”

हातातला ग्लास बाजूला ठेवत अरुंधती एक भेदक स्माइल देत म्हणाली,

“टु सी हूम? मुक्ता ऑर मनस्विनी!!”

चैतन्य थांबला आणि वळून एक करकरीत नजर तिच्यावर टाकून म्हणाला,

“मनस्विनीलामध्ये आणू नकोस! मला ह्या क्षणी इतकंच माहितीये की माय डॉटर नीड्स मी नाऊ! आणि अरुंधती एक सांगू, प्लीज फॉर गॉडस सेक, कम आऊट ऑफ द शाडो ऑफ ‘अरुंधती अय्यर’ अँड फॉर वन्स बी ए मदर ऑफ यॉर डॉटर!”

“ओह रियली? मिस्टर. चैतन्य राजे.. फर्स्ट यू बिकम ए हजबेंड ऑफ यॉर वाइफ! अँड देन ओन्ली एडवाइस मी, ओके?” अरुंधती आवाज चढवत म्हणाली.

त्यावर तितक्याच शांतपणे चैतन्य म्हणाला,

“गेली वीस वर्षं मी फक्त तेच करतोय अरुंधती!! अँड यू नो दॅट वेरी वेल!”

आणि जाता जाता वळून म्हणाला,

“चेंज यॉरसेल्फ.. अदरवाईज मुक्तासोबत मलाही गमावशील तू. डोन्ट ट्राय माय पेशन्स! इट्स हाय टाइम नाऊ!”

अरुंधतीला बऱ्याच वर्षांनी त्याच्यात जुन्या चैतन्यचा भास झाला. ती त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आणि हातातल्या रिकाम्या ग्लासकडे पाहत राहिली..

मुक्ताचा रियाज चांगला सुरू होता. पण, स्पर्धेत नक्की काय सादर करायचं याबाबतीत ती अजून साशंक होती. तिच्या मनात अजून बराचसा गोंधळ सुरूच होता. झोपाळ्यावर कसल्यातरी विचारात दंग मुक्ताला पाहून बाहेर निघालेला मल्हार क्षणभर थांबला आणि त्याने विचारलं,

"काय मग मॅडम, कसा चालूये रियाज?"

त्यावर, थोड्या नाखुशीनेच ती म्हणाली,

"चालूये ठीक-ठाक!"

तिचा तो मूड पाहून मल्हार म्हणाला,

"चल येतेस माझ्यासोबत?"

यावर किंचित हसून ती म्हणाली,

"तुझ्या त्या जंगलात? नको रे बाबा."

"अगं, जंगलात नाही. खंडू मामा म्हणत होते, शेजारच्या वाडीत एक 60-70 वर्षं जुनं कोकमाचं झाड आहे. ते आणि थोडा

आजूबाजूचा परिसर पहायला जातोय. चल तू पण.. कंटाळत नाहीस का सतत घरात बसून?”

मुक्ताला काय वाटलं कोणास ठावूक, ती उठली आणि पायात चपला सरकावून म्हणाली,

“चल!”

दोघेही मग बरेच फिरले. आजूबाजूच्या झाडांकडे, प्राण्यांकडे, पक्षांकडे पाहण्याची एक नवीच दृष्टी त्याने मुक्ताला दिली.

परत येताना एका झऱ्याखाली दगडावर बसून पाण्यात पाय सोडून तो मुक्ताला म्हणाला,

“कम, यू शुड ट्राय धिस..”

गम्मत वाटून ती आली आणि तिनेही पाय पाण्यात सोडले. आणि काय मजा, दोन-तीन मिनिटातच खूप सारे छोटे-छोटे मासे येऊन तिच्या तळव्यांना गुदगुल्या करू लागले. त्याची खूपच मजा वाटून ती म्हणाली,

“हे वॉव.. धिस इज अमेझिंग.. आय हॅव नेवर ट्राइड धिस बिफोर!”

“आय टोल्ड यू!” मल्हार हसत पुढे म्हणाला..

“वेल्कम टु मल्हार’स वर्ल्ड! याला शहरात फिश स्पा म्हणतात. हे जे लहान लहान मासे आहेत ना, garra rufa असं नावय यांचं. आपण पाण्यात पाय सोडले की हे आपली डेड स्कीन खाऊन टाकतात. शहरातल्या त्या टब मधल्या स्पाला या खऱ्या नैसर्गिक स्पाची सर नाही!”

“हम्म.. हे खरंच मस्त आहे! तू किती एकजीव झालायस रे या सगळ्यात. झाडांशी गप्पा काय मारतोयस, पक्षांशी त्यांच्या भाषेत काय बोलतोयस.. इथे तू वेगळाच भासतोस” मुक्ता भारावून म्हणत होती.

त्यावर तो नुसताच हसला. बराच वेळ दोघे तसेच शांतपणे बसून राहिले. थोड्यावेळाने, वर आभाळाच्या पोकळीकडे पाहत मल्हार म्हणाला,

“मुक्ता.. तू कधी मुसळधार पावसात चिंब-चिंब भिजलियस? कशाचीच पर्वा न करता? किंवा मध्यरात्री माळरानावर चांदण्यांनी भरलेल्या आकाशाखाली झोपलीयेस? एकटीच सिनेमा पहायला गेलीयेस? चिमणीला घरटं बांधताना पाहिलंयस? किंवा एखाद्या हरिणीला तिच्या पाडसाला जन्म देताना पाहिलंयस? या ज्या साध्या साध्या गोष्टी वाटतात ना, त्या नकळत खूप ऊर्जा देऊन जातात आपल्याला. ‘To be able to feel every ‘feel’ to its

fullest!' यात खरं थ्रिल आहे. आनंद असो, राग असो, दुक्ख असो, आपलं काम असो.. सगळं आपल्याला to its fullest जगता यायला हवं. अधे-मध्ये जगण्यात, राहण्यात काही मजा नाही बघ. रिग्रेट्सचं baggage वाहत राहिलं ना की माणसाचं जगणंच थांबून जातं.."

मल्हार मोकळ्या आकाशाकडे पाहत बोलत होता आणि मुक्ता ऐकत होती. तिच्या नृत्यात तिला नेहमी जाणवणारी उणीव खालच्या पाण्याइतकीच स्पष्ट तिला आता जाणवू लागली. तो जे बोलत होता तेच तर त्यात कमी होतं.. it wasn't to its fullest.. मनात चालू असणारे ना ना विचार, भीती हे सगळं त्यात आडवं येत होतं! एखाद्या खजिन्याची चावी सापडावी तशा आनंदात तिने त्याच्याकडे पाहिलं, त्याची नजर मात्र वर होती, अचानक आभाळात भले-मोठे ढग दाटून आले होते.. कुठल्याही क्षणी पाऊस पडेल अशी चिन्हं दिसत होती. लगोलग उठत तो म्हणाला,

"चल लवकर.. मोठा पाऊस येणारे"

दोघेही उठून जायला निघाले.. पण चार पावलंच चालले असतील की पावसाने गाठलच त्यांना. त्या जोराच्या पावसात गाडी चालवण्याची रिस्क नको म्हणून मग जवळच्या देवराईतल्या मंदिरात दोघांनी आसरा घेतला. इतक्यात, गाडीच्या खिडकीची

काच बंद आहे का पहाण्यासाठी म्हणून मल्हार परत गाडीकडे धावला..

मुक्ता मंदिराच्या पायरीशी उभी राहून पाऊस बघत होती. क्षणभर तिने डोळे मिटले आणि पावसाच्या त्या आवाजात तिला एक कमालीचा मोहक ऱ्हीदम जाणवला. तिने चटकन फोन ऑन केला आणि राग मल्हार लावला.. आणि तिच्याही नकळत, मंदिराच्या सभामंडपात तिचे पाय त्या सुरावटीवर आणि मुसळधार पावसाच्या बेधुंद्द तालावर थिरकायला लागले.. तो पाऊस जणू तिच्यातूनच बरसतोय असं वाटावं इतकी की त्यात मिसळून गेली. भान हरपून तो मल्हारसुरातला पाऊस तिने तिच्या विभ्रमांमधून पुन्हा पुन्हा जीवंत केला.

गाडीच्या काचा बंद करून मल्हार परत आला तो मुक्ताकडे पाहून दंगच झाला.. तिचं ते विलोभनीय मयूरनृत्य तो पाहतच राहिला.. पण मुक्ताला ना त्याच्या येण्याची जाणीव झाली ना त्याच्या पाहण्याची.. ती स्वत:ला सुद्धा विसरून गेली होती. हळूहळू पाऊस ओसरला.. सूर शांत झाले.. आणि मुक्ताही तिच्या त्या चिंब-भारल्या अवस्थेतून बाहेर आली. समोर मल्हार तिच्याकडे पाहत उभा होता. तिने त्याच्या डोळ्यात पाहिलं. तो भारावून गेला होता.. तिला तिची पावती मिळाली होती०

आनंदातिशयाने फुलून जाऊन ती त्याला म्हणाली,

“मल्हार.. माझं ठरलंय स्पर्धेत कुठल्या थीमवर परफॉर्म करायचंय ते!”

“कुठल्या?” त्याने कुतुहलाने विचारलं.

“राग मल्हार..” ती म्हणाली.

एकमेकांच्या डोळ्यांत मग त्यांना त्या दिवशी बऱ्याच प्रश्नांची उत्तरं मिळाली..

दुसऱ्या दिवशी सकाळच्या पहिल्या फ्लाइटने चैतन्य निघून गेला. अरुंधती तिच्या त्या आलिशान घरातून बाहेरची झगमग पाहत एकटीच बसून होती. इतकी वर्षं कधी काही न बोलणाऱ्या चैतन्यचे कालचे शब्द तिला जाळत होते. ‘जा.. तू पण निघून जा..’ ती आतल्या आत किंचाळत होती. पण वरुन मात्र शांत.. निर्विकार.. मग हळूहळू तिच्या त्या कोऱ्या डोळ्यांमध्ये तीस-पस्तीस वर्षांपूर्वीचे संदर्भ उमटू लागले. पद्मिनीताईंकडे कथ्थक शिकणारी कोवळी अरुंधती तिला आठवली.. आई-बाबांची सततची भांडणं आणि नंतर झालेला घटस्फोट याने होरपळून गेलेली.. चिडचिडी, हट्टी झालेली.. आणि त्या साऱ्यापासून पळून

जाता यावं म्हणून सतत नृत्याचा ध्यास घेतलेली. याच दरम्यान मनस्विनी तिच्या आयुष्यात आली.. आणि ती तिची जीवश्च-कंठश्च मैत्रीण झाली. सदैव हसरी, लाघवी, हुशार मनस्विनी! दोघींचही एकमेकिंशिवाय पानही हलायचं नाही. सोबत रियाज.. सोबत अभ्यास.. नंतर कॉलेजमध्ये घेतलेलं ॲडमिशनही सोबतच! अरुंधतीचं नृत्य हे कायम महत्वाकांक्षेने पछाडलेलं असायचं. सतत तिची ती प्रथम येण्याची धडपड. आणि मनस्विनी थिरकायची ती स्वत:च्या आनंदासाठी, उत्फुल्लपणे! दोघी उत्तम नृत्य करायच्या. पण दरवेळी मनस्विनी थोड्या फरकाने उजवी ठरायची. अशावेळी अरुंधतीला तिचा हेवा वाटायचा.

कॉलेजमध्ये या दोघींना येऊन सामील झाला, चैतन्य! तो हुशार होता, कलासक्त होता, मनस्वीही होता. तिघांचं प्रचंड जमायचं. ते दिवस तिघांसाठीही खूपच सुंदर आणि स्वप्नांनी भरलेले होते. हळूहळू अरुंधती तिच्याही नकळत चैतन्यच्या प्रेमात पडत गेली. पण चैतन्य मात्र मनस्विनीच्या प्रेमात होता आणि मंनस्विनीही त्याच्या. कोणीच कोणाला मनातलं सांगितलेलं मात्र नव्हतं. दिवस भराभर जात राहिले. शेवटच्या वर्षी ग्रँड सेंड-ऑफ डेला सर्वांच्या नकळत चैतन्य मनस्विनीला घेऊन कॉलेजच्या ऑडिटोरियममध्ये आला. त्या रिकाम्या ऑडिटोरियममध्ये स्टेजवर मधोमध मनस्विनीला थांबवून, गुडघ्यावर बसत तिला

त्याने लग्नाची मागणी घातली. क्षणभर तिला काही सुचलच नाही. आनंदाची एक सुरेख लहर तिला स्पर्शून गेली. पण दुसऱ्याच क्षणी तिचा चेहरा जरासा उतरला. तोवर अरुंधतीच्या भावना काही कोणापासून लपून राहिल्या नव्हत्या. तिला काय वाटेल? हा प्रश्न मनस्विनीच्या मनाला छळत होता. दोघांनी मग मिळून तिला समजावण्याचा निर्णय घेतला आणि तिथून जायला निघाले. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळच होतं..

बराच वेळ दारावरची बेल वाजत होती. मनस्विनी तिच्या खोलीत कसलंतरी पुस्तक वाचत बसली होती. जवळपास पाच-दहा मिनिटं बेल वाजतेय पाहून नाईलाजाने ती उठली आणि दार उघडायला बाहेर आली. मुक्ता-मल्हार सकाळीच बाहेर गेलेले होते. आणि कांताबाईंचा डोळा लागला होतं. बाहेर मुसळधार पाऊस सुरू होता. थोडंस वैतागूनच तिने दार उघडलं.. तर दारात चैतन्य उभा होता.. मनस्विनी क्षणभर स्तब्ध झाली. तिला काही सुचलंच नाही. काळ थांबल्यासारखा वाटला. चार-दोन मिनिटांनी तोच म्हणाला,

“आत घेणारेस मला की असच इथेच थांबायचय आपण?”

भानावर येत मनस्विनी बाजूला होत म्हणाली,

“सॉरी.. ये आत ये.”

तो तिच्यामागून आत आला. मनस्विनीचं ते कोकणी ढंगाचं तरीही आधुनिक भासणारं सुंदर घर पाहू लागला. त्याच्याकडे पाहून मनस्विनी म्हणाली,

“भिजलायस तू किती! जा.. फ्रेश होऊन घे. जिन्यातून वर गेलास की डाव्या बाजूची खोली, सध्या माझा भाचा वापरतोय.. ईफ यू डोन्ट माइंड!”

“येस येस.. आय वोंट माइंड. येतो मी फ्रेश होऊन!”

आणि तो वर गेला.

त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत मनस्विनी कोचावर टेकली. कधीतरी ही भेट होणार हे माहीत असलं तरी ती ही अशी अनपेक्षितपणे होईल असं तिला वाटलं नव्हतं. तशी तिच्या मनाची तयारीही नव्हती. कधीकाळचा आपला हा जीवलग.. मधला सगळा चक्रावणारा घटनाक्रम.. लोटलेला काळ.. आणि आताची ही आकस्मिक भेट.. साऱ्याची मनात ओळ लागायला तिला जरासा वेळ लागणार होता.

काहीवेळाने ती उठली आणि किचनमध्ये आली. गॅसवर चहाचं आधण ठेवलं. इतक्या वर्षांनीही चैतन्यला जसा आवडायचा तसा, त्याच प्रमाणातला, आल्याचा चहा तिने केला..

क्षणभर तिचं तिलाही नवल वाटलं, एवढी वर्षं लोटली तरी तिच्या हातांनी अजून त्या चहाचं तंत्र जपलं होतं.

हातात हात गुंफून मनस्विनी आणि चैतन्य ऑडिटोरियम मधून जिथे पार्टी चालू होती तिथे आले. पण तिथे सगळं एकदम शांत झालेलं होतं. मधोमध साऱ्यांचा घोळका जमला होता. काहीतरी नक्कीच घडलंय असं म्हणून दोघे गर्दीतून पुढे आले.. तर समोर खुर्चीवर शून्यात पाहत अरुंधती बसली होती. एकदम गप्प. कोणीतरी त्या दोघांना सांगितलं, कॉलेजच्या लॅंडलाइनवर तिच्या कुठल्याशा नातेवाईकाचा फोन आला होता दहा - पंधरा मिनिटांपूर्वी, तेव्हापासून ही अशी बसून आहे, काहीच बोलायला तयार नाहीये. मनस्विनी तिच्याजवळ गेली. पण अरुंधतीने तिच्याकडे न पाहता चैतन्य दिसल्या दिसल्या त्याला मिठी मारली आणि रडत रडत म्हणाली,

“आई-दादा गेले, चैतन्य! मला सोडून कायमचे..”

“गेले म्हणजे?” काही न कळून तिला खुर्चीवर बसवत त्याने विचारलं.

“ॲक्सिडेंट झालाय दोघांचा..” ती वेड्यासारखी रडत म्हणाली.

मनस्विनी आणि चैतन्यला क्षणभर सगळं सुन्न झाल्यासारखं वाटलं. अरुंधतीचं चैतन्यला घट्ट धरून ठेवणं, एक आधार म्हणून त्याच्याकडे पाहणं मनस्विनीच्या नजरेतून सुटलं नव्हतं. तिला सारं उमजलं. तिने चैतन्यकडे पाहिलं. दोघांचे डोळे भरलेले होते, त्यात समजुतीचं दु:ख भरून आलं होतं.

त्यानंतर परीक्षा झाल्यावर कोणालाही काहीही न सांगता मनस्विनी कोकणातल्या तिच्या गावी निघून गेली.. कायमचीच!

पुढे मग अरुंधती आणि चैतन्यचं लग्न झालं. मनस्विनी अशी एकाएकी का निघून गेली हे चैतन्य जाणून होता. तिच्यामागे न जाऊन किंवा पुन्हा कधीही तिला न भेटून त्यानेही तिच्या निर्णयाचा आणि इच्छेचा मान राखला. आयुष्यभर अरुंधतीची साथ देत राहिला. अरुंधतीने एक-दोन वेळा मनस्विनीशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला खरा पण मनस्विनीने तो होऊ दिला नाही. सारे संबंध तोडून टाकले. आणि त्यानंतर म्हणावे तसे प्रयत्न अरुंधतीनेही केले नाहीत. खरंतर सेंड ऑफच्या दिवशी तिच्या त्या उध्वस्त अवस्थेतही चैतन्य-मनस्विनीचे एकात एक गुंफलेले हात तिच्या नजरेतून सुटले नव्हते. आणि नंतरही मनस्विनीच्या जाण्याचं कारण उमगु नये इतकी ती अजाण नव्हती. तिला जाणीव होती त्या दोघांच्या प्रेमाची, पण मैत्रीसाठी प्रेम त्यागण्याचं जे धाडस

मनस्विनीने दाखवलं ते ती दाखवू शकली नाही. चैतन्यचं आपल्यावर म्हणावं तितकं प्रेम नाही हे माहीत असूनही त्याच्याशी लग्न करण्याचा मोह तिने टाळला नाही. तो सल पुढे तिला आयुष्यभर सलत राहिला. आपलं चुकलंय हे माहीत असूनही वर-वर ते मान्य न करता माणूस जेव्हा जगत असतो तेव्हा तो मुखवटे धारण करतो, स्वत:सकट इतरांनाही फसवत राहतो. अरुंधतीचंही असंच झालं होतं. ती मग अजून अजून कठोर बनत गेली. कथ्थकलाच विश्व समजून जगू लागली.. यश मिळत गेलं, प्रसिद्धी मिळत गेली. आणि तिचा तो मुखवटा तिची कातडी बनत गेला. पण आज घरात एकटीने बसून तिला स्वत:चा सामना करावा लागणार होता.. मुखवटा काढून!

चैतन्य आवरून खाली आला. बैठकीत सोफ्यावर बसला. मनस्विनीने त्याला चहा दिला. दोघांनीही इतकी वर्षं एकमेकांशी न बोलता काढली होती. त्यामुळे आता असं एकदम एकमेकांच्या समोर आल्यावरही त्यांना फारसं काही बोलायची आवश्यकता वाटत नव्हती. थोड्यावेळाने मनस्विनी म्हणाली,

"मला माहीत नव्हतं तू येतोयस ते.. मुक्ता काही म्हणाली नाही."

चहाची तीच पूर्वीची चव पाहून आतल्या आत सुखावून तो म्हणाला,

“कळवलं नव्हतं मी तिलाही. अचानक आलो. मुंबईत झालेला प्रकार समजला. मुक्ताची काळजी वाटत होती. आणि सांगून सवरून आलो असतो तर हा असा अचानकातला लाभ मिळाला नसता ना!”

“म्हणजे?” न समजून तिने विचारलं.

“म्हणजे, मी येणार हे माहीत असतं तर आधीच मनाची तशी तयारी करून, काय बोलायचं-काय नाही बोलायचं याचा दहा वेळा स्वत:शीच विचार करून, चेहरा कोरा करून बसली असतीस तू.. हा तुझा आत्ताचा शांत-खोल आनंदाने भरलेला, विस्मयित चेहरा पहायला मिळाला नसता मला. तू न सांगता मला सोडून आलीस, मी न सांगता तुला भेटायला आलो.. फिट्टंफाट!!”

सोफ्यावर मागे टेकून, हातात चहाचा कप धरून, तिच्या डोळ्यात पाहत तो शांतपणे बोलत होता. त्याचं ते उत्तर ऐकून मनस्विनीला भरुन आलं. पण ती काहीच बोलली नाही.

इतक्यात दारावरची बेल पुन्हा वाजली.

“मल्हार-मुक्ता असतील” म्हणत मनस्विनी दार उघडायला गेली.

मल्हार आणि मुक्ता आत आले. बाहेरचा पाऊस आता थांबला होता. मुक्ता नेहमीपेक्षा खुश दिसत होती. तिला मनस्विनीला काय सांगू अन काय नको झालं होतं. ती बोलायला तोंड उघडणार इतक्यात तिला सोफ्यावर बसलेला चैतन्य दिसला. आणि ती आनंदाने जवळ-जवळ किंचाळलीच..

"बाबा तू?? कधी आलास? आणि असा अचानक? व्हॉट ए प्लेजंट सर्प्राइज इट इज!" तिने जाऊन त्याला एक घट्ट मिठी मारली.

"भेटावंसं वाटलं तुला म्हणून आलो.. कशी आहेस तू? आणि रियाज कसा चालूये?"

त्यावर मल्हारकडे पाहत मुक्ता म्हणाली,

"हम्म.. मी मस्त!! रियाज.. आतापर्यंत ठीक-ठाक चालू होता पण आता मस्त चालणारे!"

"म्हणजे?" चैतन्यने विचारलं.

थोडसं सावरत ती उत्तरली, "अरे म्हणजे, तू आलायस नं आता म्हणून.."

मनस्विनी आणि मल्हार, बाप-लेकीचं बोलणं ऐकत होते. त्या दोघांकडे पाहत मुक्ता म्हणाली,

“बाबा ही माझी मनस्विनी ताई.. तुमची ओळख झालीच असेल आता. आणि हा मल्हार, तिचा भाचा आणि आता माझा खूप चांगला मित्र!”

चैतन्यने त्याच्याकडे पाहत हसून म्हटलं, “हाय.. आपण रूम-मेट्स आहोत आता थोडे दिवस..” यावर मग मनस्विनी आणि चैतन्य हसले. मल्हारने गोंधळून नुसतच “हाय” म्हटलं.

चैतन्यने विचार केला होता की मुक्ता खूप नाराज असेल, उमेद हरवून बसली असेल. पण इथे येऊन त्याला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला होता. तिला पूर्वीसारखं खळाळताना पाहून त्याला मनापासून आनंद झाला. तिच्या डोळयात यावेळी त्याला एक वेगळीच चमक दिसली. त्या दिवशी रात्री त्याने मनस्विनीचे आभारही मानले..

“थॅंक यू मनस्विनी.. मुक्ताची खरंतर खूप काळजी वाटत होती मला. पण ती इथे मजेत आहे हे पाहून खरंच बरं वाटतय.”

“वेल, यावेळी थॅंक्स मला नको म्हणूस. मी काही नाही केलं.”

“मग?” त्याने कुतुहलाने विचारलं.

त्यावर थोडासा pause घेत ती म्हणाली,

“मल्हार.. त्याची जादू आहे सगळी. मुंबईहून आल्यापासून ती बसलीच होती सगळं काही सोडून देऊन. शून्यात पाहत. माझेही सगळे प्रयत्न थकले होते. पण मल्हारने तिला काय समजावलं काय माहीत, ती हळूहळू पूर्वीसारखी होत गेली. आणि तू आलास त्यादिवशी दोघे कुठेतरी गेले होते, तिथून आल्यापासुन तर ती एकदमच बदलूनच गेलीये.”

यावर चैतन्य जरासा शांत झाला. मनस्विनीच्या मनात डोकावली होती तशीच शंका त्याच्याही मनात डोकावली. तो म्हणाला,

“म्हणजे.. ती प्रेमात वगैरे पडलिये का?”

अपेक्षित प्रश्न ऐकून मनस्विनी म्हणाली,

“हो.. ऑल्मोस्ट! पण तिचं तिला ते अजून उमगलं नाहीये असं वाटतं.”

“आणि मल्हार?”

“तो तर आहेच तिच्या प्रेमात, पहिल्यांदा तिला पाहिलं तेव्हापासून!”

“ओहह... दॅट्स ए गुड न्यूज देन.. माझी मुलगी फायनली कोणाच्या तरी प्रेमात पडलिये! तिचा एकलकोंडा स्वभाव पाहता मला तिची काळजीच लागून राहिली होती. मल्हार सीम्स ए नाइस

गाय! मी बोललो ना त्याच्याशी.. त्याचं काम आणि त्याविषयीच त्याचं passion दोन्ही इंट्रेस्टिंग आहे.”

त्यावर थोड्याशा शांत स्वरात मनस्विनी म्हणाली,

“येस, ही इज! पण, ते दोघही एकदम विरुद्ध आहेत रे एकमेकांच्या. नॉर्थ अँड साऊथ पोल! मला थोडी काळजी वाटते त्यामुळे. आणि अरुंधती? मला नाही वाटत तिला हे पटेल!”

थोडासा सिरियस होत चैतन्य म्हणाला,

“अरुंधतीचं सोड.. आय वोंट लेट हर रुईन माय डॉटर’स लाइफ एनीमोर! अँड डोन्ट वरी अबाऊट देम ऑल्सो.. opposites attract, यू नो धिस वेरी वेल! आणि त्यांच्यात जे काही आहे ते खरं-खुरं असेल नं तर गोष्टी त्यांचं ते फिगर आऊट करतील कसही करून! सो चिल..”

मनस्विनीला त्याचं म्हणणं पटलं, म्हणजे तसं तिने दाखवलं तरी.

इतक्या रात्री अंगणातले दिवे चालू बघून मुक्ता बाहेर आली तर समोर मनस्विनी आणि चैतन्य पायरीवर बसलेले तिने पाहिले. तिला क्षणभर काही कळलच नाही. ते काय बोलत होते हे जरी तिला कळलेलं नसलं तरी कुठलातरी गंभीर विषय आहे इतकं तिला समजलं. पण तिला आश्चर्य याचं वाटत होतं की हे दोघे

इतक्या उशिरा गप्पा मारत बसलेयत.. इतपत ओळख यांची कधी झाली एकमेकांशी? चैतन्य तर कालच आलेला होता. तिची चाहूल लागून दोघांनी वळून पाहिलं तेव्हा तिच्या डोळयातले प्रश्न त्या दोघांनाही समजले. तिचे अजून गैरसमज होऊ नयेत आणि बहुधा सगळं खरं सांगायची वेळ आता आलीये असं म्हणून चैतन्यने त्या रात्री तिला त्या तिघांच्या जगावेगळ्या नात्याविषयी सगळं सांगितलं. मुक्ताला आश्चर्याचा मोठा धक्काच बसला. आपल्या आयुष्यातल्या तीन खूप महत्वाच्या व्यक्ति एकमेकांशी या अशा विचित्र बंधाने बांधल्या गेल्या आहेत आणि हे आपल्याला आत्ता कळतय या साऱ्याचाच तिला प्रथम खूप राग आला. पण नंतर शांत डोक्याने विचार केल्यावर, तिला त्यातली गुंतागुंत, त्याग, प्रेम आणि त्यासोबतच या साऱ्याच्या पायात तिघांनी जगलेलं अत्यंत यातनामय आयुष्य या साऱ्याची कल्पना आली. आणि त्यात सर्वात जास्त होरपळून निघाली होती मुक्ता स्वत:!! आता परिस्थिति वेगळ्या दृष्टीकोणातून तिला उमजायला लागली. मनस्विनी-चैतन्यने दाखवलेला मनाचा मोठेपणा तिला जाणवलाच पण आपली आई अशी का घडत गेली असावी याचा अंदाजही आता ती बांधू शकत होती.

चैतन्य मग दोन-तीन दिवस तिथे राहून नंतर स्पर्धेच्या वेळी परत येण्याचं मुक्ताला प्रॉमिस करून निघून गेला. तो खरंतर आला

होता मुक्ताला भेटायला पण मुक्ता मात्र इतकी तिच्या रियाजात दंग झाली होती की ती hardly चैतन्यला वेळ देऊ शकली. स्पर्धेच्या तिन्ही राऊंडसचा अभ्यास, त्यांची तयारी यात ती प्रचंड बिझी होती. पण चैतन्यला या साऱ्याचा आनंदच झाला. तिला असं स्वत:ला झोकून देताना पाहून त्याच्याही अपेक्षा वाढल्या होत्या. अरुंधतीला तिने खोटं ठरवावं असं त्यालाही आता मनोमन वाटु लागलं होतं. मनस्विनी तिला मार्गदर्शन करतच होती. पण फायनल परफॉर्मेंस मात्र मुक्ताने स्वत: कोरिओग्राफ करायचा असं ठरवलं होतं. तिची त्याविषयीची कल्पनाही तयार होती. इतक्या मोठ्या स्पर्धेत असे प्रयोग करणं खरंतर रिस्की होतं. पण, मनस्विनीने तिला तसं करू दिलं. उलट प्रोत्साहनही दिलं.

चैतन्य गेल्या दुसऱ्या दिवशी सकाळचा रियाज आटोपून हातात डायरी घेऊन मुक्ता धावत मनस्विनीकडे आली. तिला तिने घरभर शोधलं. पण ती कुठे दिसली नाही. तेव्हा तिची लगबग पाहून व्हरांड्यात लॅपटॉपवर काही तरी काम करत बसलेला मल्हार म्हणाला,

“मावशी, कांताबाईंकडे गेलीये सकाळीच. कार्यक्रम आहे म्हणे काहीतरी तिकडे.”

“अरे हो की.. मला सांगितलं होतं तिने. विसरलेच बघ मी.” स्वत:च्या वेंधळेपणावर हसत झोपाळ्यावर बसत ती म्हणाली.

“खजिना सापडलाय की काय तुला कसला? इतकी का शोधतेयस तिला. घाम बघ किती आलाय.”

“अरे रियाज करत होते म्हणून आलाय. खजिनाच सापडलाय! माझी कविता ऐकवायची होती तिला.. त्यावर पेरफोर्म करणारय मी अभिजात कथ्थकच्या स्टेजवर.”

“कवितेवर नृत्य?” मल्हारने गोंधळून विचारलं.

“अरे म्हणजे कविता नृत्याचा एक भाग असेल.. ताईच्या आवाजात रेकॉर्ड केलेली. ती खूप सुंदर वाचते.”

मुक्ता उत्साहाने बोलत होती.

“हम्म.. साऊंडस इंट्रेस्टिंग!!”

तिने त्याच्याकडे हसून पाहिलं. आणि हातातल्या लॅपटॉपकडे पाहत म्हणाली,

“तू काय करतोयस? काम कसं चालूये तुझं?”

त्यावर एक दीर्घ श्वास घेत मल्हार म्हणाला,

“काम उत्तम चालूये. उद्या निघतोय केरळला जायला. केरळ-कर्नाटकातले काही स्पॉट्स अभ्यासले की माझं इथलं काम संपेल. बाकीचं मी लंडनला जाऊन पूर्ण करू शकतो.”

“म्हणजे तू जातोयस?” मुक्ताचा उत्साह ओसरला होता.

“हम्म.. आत्ताच बोलणं झालं आमचं. तिकडे नवीन कामं आलीयेत. सो इथलं लवकर आटोपून निघायचय. केरळवरूनच फ्लाइटच बूकिंग केलय.”

“आर यू सिरियस? तू स्पर्धेपर्यंत थांबणार नाहीस? उद्याच जातोयस?”

“हम्म.. जावं तर लागेल.”

यावर ती काहीच बोलली नाही. तो पुढे म्हणाला,

“पाय तर माझाही निघत नाहीये यावेळेस. पण काय करणार काम आहे.”

“का निघत नाहीये पाय?” मुक्ताने विचारलं.

त्यावर हातातला लॅपटॉप बाजूला ठेवत, तिच्यासमोर बसत तो तिला म्हणाला,

“त्या दिवशी पहाटे, पारिजातकाच्या सड्यामध्ये उभं राहून माझ्याकडे पाहणाऱ्या त्या भिरभिर डोळयांमध्ये जीव गुंतलाय माझा!”

“म्हणजे?” काही न कळल्याचा आव आणत मुक्ताने नजर खाली वळवत विचारलं.

“तुला कळलं नाही मी काय म्हणतोय ते?” मल्हारने प्रतिप्रश्न केला.

तिने नकारार्थी मान हलवली.

“ठीक आहे.. जेव्हा कळेल तेव्हा बोलू मग!” यावर दोघेही शांतचं राहिले.

तो काय म्हणतोय ते मुक्ताला कळत नव्हतं असं नाही पण ते ॲक्सेप्ट करायला तिचं मन अजून तयार होत नव्हतं. मुळात हा असा विचार तिने केलाच नव्हता. त्यांच्यात जे काही आहे ती निव्वळ मैत्री आहे याच समजात ती होती. आणि सध्यातरी तिच्या डोक्यात स्पर्धेशिवाय दुसरे कुठलेही विचार नव्हते. मल्हारला याची जाणीव होती आणि म्हणूनच त्याने लवकर परत जाण्याचा निर्णय घेतला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच तो निघून गेला. मुक्ताला मग एकदम खूप रिकामं रिकामं वाटू लागलं. का कोणास ठावूक, त्याचं असणं

तिने गृहीत धरलं होतं. पण मग तिने पुन्हा तिला रियाजात गुरफटून घेतलं. स्पर्धा आता अगदी आठवड्यावर आली होती. तिची सगळी तयारी ऑल्मोस्ट पूर्णही झाली होती. पण मल्हारच्या जाण्याने तिला एक अनाम पोकळी जाणवू लागली होती. तिचं मन रियाजात म्हणावं तसं रमेना. पुन्हा काहीतरी सुटतय असं वाटू लागलं. या शेवटच्या टप्प्यावर तिला असं आऊट ऑफ फोकस झालेलं पाहून मनस्विनी रात्री हळदीचं दूध देता देता तिला म्हणाली,

"मुक्ता.. एक गोष्ट सांगु तुला?"

"सांग ना"

"प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते बेटा. एकदा का ती वेळ टळली की ती गोष्ट आपल्या हातातून निसटून जाते.. कायमची! आम्ही ज्या चुका केल्या त्या तुम्ही करू नका. फॉलो यॉर हार्ट विदाउट एनी सेकंड थॉट! बोल मल्हारशी एकदा."

तिचं हे अनपेक्षित बोलणं ऐकून मुक्ता आधी थोडी चकित झाली आणि मग मानेनेचं होकार भरत झोपायला निघून गेली.

चैतन्य परत आल्यापासून त्याच्यात आणि अरुंधतीमध्ये फारसं बोलणं झालच नव्हतं. अरुंधती तिच्या रूटीनमध्ये बिझी

होती. म्हणजे तसं दाखवत तरी होती. आणि चैतन्यला त्यांच्यात बोलण्यासारखं काही उरलंय असं वाटत नव्हतं. स्पर्धेच्या दोन दिवस आधी तो दिल्लीला जायला निघाला. निघताना त्याने अरुंधतीला विचारलं,

“तू? येणार नाहीस?”

त्याच्याकडे शांतपणे पाहत, ती म्हणाली,

“तू हो पुढे.. येणार आहे मी. पण यावेळी माझा रोल जरासा वेगळा आहे!”

तिच्या त्या कोड्यात टाकणाऱ्या बोलण्याने तो जरासा साशंक झाला. पण तिला काहीही न म्हणता तिथून  निघून आला.

मुक्ताने रात्रभर मनस्विनीच्या बोलण्याचा विचार केला. आणि हो-नाही करत शेवटी तिने फोन हातात घेतला. मल्हारचा नंबर सर्च केला. आणि दोघांचा त्यादिवशी झऱ्याखाली बसल्यावर काढलेला सेल्फी तिने त्याला पाठवला. खाली caption होतं, ‘वाट पाहतेय, तुझी मुक्ता!’

दुसऱ्या दिवशी उठून तिने पुन्हा पुन्हा फोन चेक केला. मेसेज सेंट होता आणि रीड केलेलाही होतं. पण त्यावर रीप्लाय मात्र आलेला नव्हता. ती थोडीशी खट्टू झाली. पण विचार करत

बसायला तिच्याकडे वेळ नव्हता. दुपारीच ती आणि मनस्विनी दिल्लीला जायला निघणार होत्या. उद्यापासून स्पर्धा सुरू होणार होती. निघायच्या अगदी काहीवेळ आधी मनस्विनीचा फोन वाजला. तो ठेवताना तिचा चेहरा गंभीर झाला होता. मुक्ताने विचारलं,

"ताई, काय झालंय?"

विचारातून बाहेर येत मनस्विनी म्हणाली,

"मुक्ता, अरुंधती यावर्षी स्पर्धेच्या जजींग पॅनलवर आहे!"

मुक्ताला क्षणभर काही सुचलं नाही. सगळी उमेद संपल्यासारखी वाटली. पण मग सगळं बळ एकवटत ती मनस्विनीला म्हणाली,

"काळजी करू नकोस ताई, अरुंधती अय्यरच्या असण्या-नसण्याचा आता माझ्या नृत्यावर मी परिणाम होऊ देणार नाही. आणि राहिली गोष्ट निकालाची, तर मला आधी माझ्या नजरेत जिंकायचय. त्यानंतर मग निकाल काहीही लागो, मला फरक पडत नाही."

मनस्विनी मुक्ताकडे पाहतच राहिली. तीच्यातून एक वेगळीच ऊर्जा वाहत असलेली तिला जाणवली. आणि मग दोघी दिल्लीसाठी रवाना झाल्या.

स्पर्धेचे टेक्निकल आणि theoretical राऊंडस मुक्ताने सहज पार केले. त्यानंतरच्या क्वालिफाईंग राऊंड मध्येही तिने परीक्षकांवर चांगली छाप पाडली. आता ती फायनल दहामध्ये होती. सेमी-फायनल झाली की टॉप फाइवमध्ये उद्या फायनल रंगणार होती. एकाहून एक सरस आणि दर्जेदार स्पर्धक देशाच्या काना-कोपऱ्यातून आलेले होते. स्पर्धा चुरशीची होत होती. सेमी-फायनलसाठी मुक्ताने तुलसीदासांचा एक सुंदर अभंग निवडला होता. खरंतर अशावेळी कथ्थकच्या टेक्निकल बाजू ठळकपणे दर्शवता येणारे परफॉर्मेंस स्पर्धक देणं पसंत करतात. कारण त्याला लगोलग वाहवा मिळते. पण हे असं काव्य-प्रधान, भावप्रधान नृत्य कितपत परीक्षकांच्या पसंतीस पडेल याबद्दल थोडी साशंकता होती. पण मुक्ताने तिच्या अदाकारीने त्या अभंगामधला भक्तिरस असा काही साकार केला की परीक्षकांना त्याकडे दुर्लक्ष करता येईना. दिवसाकाठी टॉप फाइव स्पर्धकांची नावं जाहीर होणार होती. मुक्ता, मनस्विनी, चैतन्य कानात प्राण आणून वाट पाहत होते. परीक्षक बाहेर आले. पहिलं नाव झालं, दुसरं झालं, तिसरं-चौथही झालं. मुक्ताने आता आशा सोडली. पण शेवटी परीक्षकांपैकी एकाने मुक्ताचं नाव घेत म्हटलं,

“खरंतर असे पर्फोर्मंसेस खूप कमी होतात. त्यांना महत्वही कमी दिलं जातं. पण मुक्ता चैतन्यचं प्रेक्षकांच्या मनाची पकड घेणारं नृत्य पाहिल्यावर त्यांना अजून एक संधी देण्याचं आम्ही ठरवलं आहे.”

तिघांनीही रोखून धरलेला श्वास सोडला. मुक्ताची धड-धड शांत झाली. परीक्षकांमध्ये बसलेल्या अरुंधतीवर तिने एक नजर टाकली. ती निर्विकारपणे बसून होती. डोळयांची पापणीही न लवता!

मुक्ताला आता उद्याच्या फायनलची चिंता वाटू लागली होती. ती अगदी थोड्या फरकाने आज निवडली गेली होती. उद्या तिला परीक्षकांची पकड घेणारा, त्यांना मंत्रमुग्ध करणारा नृत्याविष्कार सादर करावा लागणार होता. तिच्या मनात खूप धाकधुक चालू होती. झोपायच्या आधी तिने पुन्हा फोन चेक केला. अजूनही मल्हारचा काही रीप्लाय आला नव्हता. तिला एकदम खूप निराश वाटू लागलं. त्याच्या अनुपस्थितीत त्याचं तिच्या आयुष्यातलं महत्व तिला तीव्रतेने जाणवत होतं. इतके दिवस ती जे नाकारत होती ते आता तिच्या मनाने पुर्णपणे मान्य केलं होतं. पण मल्हारचं हे असं काहीच न बोलणं तिला छळत होतं. अकारण एकटेपणा देत

होतं. मनाचा हिय्या करून हे सारे विचार बाजूला सारत पूर्ण लक्ष उद्याच्या फायनलवर केन्द्रित करायचं असं ठरवून ती झोपी गेली.

फायनल सुरू झाली. मुक्ताचं नृत्य सगळयात शेवटी होतं. सुरूवातीचे दोन नृत्याविष्कार पार पडले. तिसरा सुरू झाला होता. मुक्ता तयार होऊन बसली होती. वाइन कलरची पैठणीच्या धाटाची घागरा-चोळी आणि त्यावर सुरेख पिवळया रंगाचा झिरमिरीत दुपट्टा तिने परिधान केला होता. केसांपासून पायापर्यंत सुंदर मौक्तिकी आभूषणांनी ती मढली होती. पायघोळ घुंगरू आणि रक्तवर्णी कुंकवाचे रेखीव लेपण तिच्या गोऱ्या पावलांवर शोभून दिसत होते. काजळाची दाट रेखा आणि नाजुक लाल टिकली, डाळिंबी ओठ तिचं सौंदर्य अजूनच खुलवत होते. ती श्वास रोखून तिच्या नावाची घोषणा होण्याची वाट पाहत होती. मनातले सारे विचार हळू-हळू मागे पडू लागले होते. तिने डोळे उघडून शांत चित्ताने एकवार स्वत:कडे आरशात पाहिलं आणि तेवढ्यात स्टेजवर तिचं नाव announce झालं, 'मुक्ता चैतन्य'.. ती उठली. स्टेजवर आली. साऱ्यांना वाकून अभिवादन केलं. समोर बसलेले परीक्षक, अरुंधती, दुसऱ्या रांगेत बसलेला चैतन्य, त्याच्या बाजूला बसलेली मनस्विनी साऱ्यांवरून एक नजर फिरवून आता ती मागे वळणार

इतक्यात तिला काहीतरी जाणवलं, तिने पुन्हा एकवार समोर पाहिलं.. मनस्विनीच्या बाजूच्या खुर्चीवर चक्क मल्हार बसलेला होता. ती आनंदाने भरून गेली. इतका आनंद तिला पूर्वी कधीही झाला नव्हता. त्याने तिच्याकडे पाहून एक छान स्मित केलं. तिनेही गोड हसून ते स्वीकारलं. आणि परिपूर्ण भावाने मागे वळली.

राग मल्हार सभागृहात घुमू लागला..

सा; म; प; - प; म; रे;

,नि१ सा रे प म रे ; म प म रे ; म प ; प म नि प म रे ; रे रे प म रे ; रे सा ,नि१ सा ;

आणि मुक्ताची पाऊले त्यावर थिरकु लागली..

अत घोर घोर गरजत आये..

मुक्ता दंग होऊन नाचू लागली. अचूक पदलालित्य.. अचूक भाव.. किंचित जास्त नाही किंचित कमी नाही. ती तिचा जीव त्यात ओतत होती. मग हळूहळू ते सुर शांत होत गेले आणि पावसाचा आवाज घुमायला लागला. मुसळधार पावसाचा आवाज.. मुक्ताचा नृत्याभिनय त्याला जीवंत करत होता. आणि मग पावसाची लय आणि मुक्ताचे घुंगरू यांची अनिमिष जुगलबंदी रंगली.. प्रेक्षक दंग होऊन पाहत राहिले. त्या पावसाच्या धुंद नादात मग मिसळली मुक्ताची कविता..

घिरत घिरत कारे मेघ
विचल विचल विहग सचेत
कौन कहॉसे आयी अंगनीयां
लत उमडके, दंग संवरियां
थिरक थिरक मयूर नृत्य
कहत कहत खग समवेत,
सवर सवर ऑचल ओ धरा..
गरजत आयो सजन तोहरा!
गरजत आयो सजन तोहरा!!

मुक्ता तिच्या विभ्रमांमधून त्या कवितेला जीवंत करू लागली. तिचे डोळे जणू गात होते. आणि पाऊले नाचत होती. पाऊस तर बरसत होताच कवितेतून, संगीतातून.. परीक्षकांसह सारे मंत्रमुग्ध होत होते. शहारत होते. कविता पुढे जात होती.

संगीत होय वृष्टी,
गाये जो मेघ!

तपित होय शीतल,

बहे जो मेह!

आंगन मे चितचोर,

बरस बरस बरसे घनघोर

‘कैसे कहुं री, कौन गीत गांऊ री..’

कहे धरा भाव-विभोर

व्याकुल वह जाय भीग

अंग अंग संग पुनीत

लाये खुशीयां लाये बहार

राग-रंग-सूर-ताल-लय

सबही मलहार सबही मलहार!!

मुक्ताला आता भान राहिलं नव्हतं. त्या धरेप्रमाणेच तीही तिच्या मल्हाराच्या पावसात नखशिखांत भिजत होती. गात होती. नाचत होती. पाऊस जगत होती.

कविता संपली. पुन्हा राग मल्हार सुरू झाला. पुन्हा तेच सुर.. तीच चीज..

अत घोर घोर गरजत आये..

द्रुत लय.. पुन्हा पावसाचा आवाज.. आणि त्यात मिसळलेल्या कवितेच्या शेवटच्या ओळी..

लाये खुशीयां लाये बहार

राग-रंग-सूर-ताल-लय

सबही मलहार सबही मलहार!!

आणि मग त्या मुग्धभारल्या समेवर तिचा नृत्याविष्कार थांबला. मिनिटभर सभागृह पूर्ण शांत. सारेचं मंत्रमुग्ध झालेले. दोन मिनिटांनी अरुंधती तिच्या खुर्चीवरून उठली आणि भरल्या डोळ्यांनी तिने मनसोक्त टाळ्या वाजवल्या. आणि मग पूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजरात पुन्हा पुन्हा न्हाऊन निघालं. मुक्ताने गुडघ्यावर बसत खाली डोकं टेकलं.. तिच्या डोळयात पाणी होतं. तिला जे हवं होतं आज ते तिला मिळालं होतं. स्टेजवरची ती ecstatic अवस्था तिने अनुभवली होती. आता निकाल केवळ उपचारापुरता उरला होता. ती केव्हाच जिंकली होती!

कार्यक्रम संपल्यावर हातात ट्रॉफी घेऊन मुक्ता बाहेर आली. तिने मनस्विनीला कडकडून मिठी मारली. चैतन्यला मिठी मारली. हसत हसत ती रडतही होती. मल्हार तिच्या समोर आला. तिच्या डोळयातल्या पाण्याचा एक थेंब बोटाच्या टिपेवर घेत तो म्हणाला,

“हे जपलं पाहिजे.. फार मौल्यवान आहे हे!”

आणि मग हसत मुक्ता त्याला बिलगली.

थोड्यावेळाने अरुंधती तिथे आली. तिने मुक्ताचं अभिनंदन केलं. मायेने तिच्या पाठीवरून हात फिरवला. तिचं हे रूप मुक्तासाठी नवीन होतं. मुक्ताने तिला वाकून नमस्कार केला. 'कायम आनंदात रहा' अरुंधतीने तिला आशीर्वाद दिला.

आणि जाता जाता मनस्विनी आणि चैतन्य समोर थांबत, चैतन्यकडे पाहत ती म्हणाली,

"माझे लॉयर तुला कॉनटॅक्ट करतील. त्यांना सहकार्य कर. मी.. divorce देतेय तुला चैतन्य!"

आणि मग मनस्विनीकडे पाहत म्हणाली,

"यू बोथ deserve ईच अदर!!"

एवढंच बोलून ती तिथून गेली. स्वत:च्या सावलीतून सुटून एक मुक्त श्वास घेण्यासाठी..

मुक्तासह सारे तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिले.

## पुस्तक म्हणजे मैफल

फ़ेसबुक, whatsapp, किंवा अनेक नवीन माध्यमांत वाचन होतंच. फ़ेसबुक चं नावच मुळी 'बुक' आहे. मधेच एखादी लकेर, नंतर कुठे विनोद, अचानक कोणी तरी आक्रस्ताळं राजकीय भाष्य करणार आणि ते संपतं न संपतं तो एखाद्या मृत्यूची बातमी वा लग्नाचा वाढदिवस. या माध्यमांतूनही ज्ञान, भावना, यांचा खेळ चालतो; नाही असं नाही. पण तो क्षणिक असतो. ओझरता असतो. एखादी सुंदर लकेर मन मोहून टाकते खरेच. पण मैफलीचा गंध जसा आयुष्यभर दरवळत रहातो तसे होत नाही.

आपल्या मनाला, आपल्या बुद्धीला वरच्या दर्जावर नेण्यासाठी पुस्तके आवश्यक असतात. मग ती छापील असो वा ई. आपले मन आणि बुद्धी यांना दर्जेदार खुराक द्या. पुस्तके वाचत रहा. ई साहित्य ईपुस्तके विनामूल्य देते त्यामागे एक उद्देश आहे. एक मन, एक बुद्धी जेव्हा वरच्या पायरीवर जातं तेव्हा ती व्यक्ती वरच्या दर्जाला जाते. जेव्हा समाजातील असंख्य लोक वरच्या पायरीवर जातात तेव्हा समाजच प्रबुद्ध होतो.

वाचत रहा. पुस्तके वाचत रहा.

www.esahity.com